दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -७४ | बुधवार दि.१९ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-74 | Wednesday, Dt.19 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# राखीव जागांना जातीय चेहेरे देणाऱ्यांचे खरे बुरखे कोण काढणार ?

## बीडची निवडणूक विकासावर नव्हे तर दुर्दैवाने जातीवर होणार !

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा राजकीय दृष्टिकोनातून प्रगल्भ आणि संवेदनशील जिल्हा म्हणून महाराष्ट्रात परिचित आहे. मागील काही वर्षांमध्ये पुरोगामी आणि सर्वसमावेशक असलेल्या या जिल्ह्यात जातीयतेचे विष प्रखरतेने वाढत आहे. राजकारणात जात इतक्या खोलवर रुजत आहे की आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागेवर मताने बहुसंख्य असलेला समाज त्या राखीव जागेवरील महिलेला आपली पत्नी करून, सासू करून, मेहुणी करून उभा करत आरक्षणाच्या मूळ हेतूलाच तिलांजली देत आहे. खरं तर अशा खऱ्या जातीयवादांचे बुरखे खऱ्या अर्थाने कोण उघडे करणार ? हा प्रश्न उभारला आहे. जर अशा प्रवृत्तीला आत्ताच ठेचले नाही तर भविष्यात म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतोय म्हणण्याची वेळ येईल हे निश्चित.

भारत देशामध्ये विविध जातीं धर्मांचे लोक एकत्रित रित्या राहतात. मात्र उच्च - नीच ही समाजातील दरी दूर करण्यासाठी घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित जातींना आरक्षणाचे कवच कुंडल दिले.या माध्यमातून हा समाज प्रगत समाजाच्या प्रवाहात येईल आणि या समाजाची राजकीय, सामाजिक पत वाढेल हा खऱ्या अर्थाने हेतू होता. मात्र सत्ता आपल्याच कडे राहावी, सत्तेच्या खुर्चीवर घटनेनुसार आरक्षणाची व्यक्ती निवडण्याची वेळ आली तरी देखील ती व्यक्ती फक्त नामदारी राहावी आणि सत्ता आपणच उपभोगावी यासाठी काही स्वार्थी राजकीय मंडळींनी आरक्षणा नुसार त्या त्या जातीतील महिलांना आपल्या घरात पत्नीचे स्थान देण्यास सुरुवात केली. त्यांना सन्मानाने पत्नी केलं आणि वागवलं तर त्याचे स्वागतच. मात्र केवळ राजकीय स्वार्थासाठी आरक्षित जागेवरील समाजातील मुलीला स्वीकारायचे आणि तिचा र.... इतकाच जर तिचा उपभोग होणार असेल तर आरक्षणाचा गैरफायदा घेण्यास सुरुवात होते. असाच गैरफायदा अनेक वर्षापासून बीड जिल्ह्यामध्ये घेतला जात आहे. आता याचा कहर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत विशेषता बीड नगरपालिकेच्या हद्दीमध्ये प्रकर्षाने समोर आला आहे. अशा प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी कोणी पुढाकार घेणार आहे का नाही ? असा प्रश्न खऱ्या अर्थाने निर्माण झाला आहे. मांजराच्या गळ्यात घंटा बांधायची कोणी ? कोणी पुढाकार घ्यायचा ?असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे. मात्र आरक्षणाचा लाभ हा खऱ्या आरक्षित जागेतील समाजालाच मिळाला पाहिजे. यासाठी आंबेडकर प्रेमी, आरक्षण प्रेमी डोळे उघडून या जातीवाद्यांच्या डोळ्यात अंजन घालण्यासाठी एकत्रित येऊ शकणार नाही का ? असा प्रश्न सामान्य जनतेसमोर निर्माण झाला आहे. अशा जातीयवादी प्रवृत्तींना वेळीच ठेचण्यासाठी ज्यांनी बहुसंख्य जातीचा लाभ घेण्यासाठी आरक्षणातील उमेदवार लादले अशा नेत्यांना,पदाधिकाऱ्यांना भविष्यात आंबेडकर प्रेमी आणि आरक्षण प्रेमी नागरिकांनी विरोधामध्ये मते देऊन त्यांना घरी बसवले पाहिजे. एवढेच नव्हे तर त्यांचे खरे जातीयवादी असलेल्या चेहऱ्यावरील बुरखे उघडे करून त्यांना जनते समोर नागवे केले पाहिजे असं म्हटलं तर वावगं ठरू नये.

### निष्ठावंतांना डावलून पैशाच्या पाठबळावर उमेदवार लादणाऱ्यांनाही धडा शिकवण्याची वेळ !!

ज्या कार्यकर्त्याने आपल्या पक्षात वर्षानुवर्ष निष्ठेने काम केले. पक्ष वाढीसाठी आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवले. अनेक केसेस अंगावर घेतल्या, आंदोलने केली अन् पक्ष वाढवला अशा कार्यकर्त्यांना जर आरक्षणामुळे सत्तेची खुर्ची मिळणार असेल तर ती त्या पक्षाने, त्या पक्षातील नेतृत्वाने प्राधान्याने देणे गरजेचे आहे.मात्र अशा निष्ठावंतांना डावलून त्या ठिकाणी पैशाची बोली करून जो उमेदवार सर्वाधिक पैसे खर्च करण्यासाठी तयार असेल त्या उमेदवाराचा पैसा आणि जात पाहून त्याचा राजकीय फायदा कसा होईल हे पाहून ज्या उमेदवाराला कसलेही सामाजिक, राजकीय योगदान नाही, साधं बोलताही येत नाही, नगरपालिकेचे प्रशासन चालवण्याची कसलीही माहिती नाही.इतकेच काय ज्या उमेदवारांचे चारित्र्य देखील संपन्न नाही असे उमेदवार जर राजकीय पक्ष केवळ जात आणि पैसे बघून देणार असेल तर अशा उमेदवारांना आणि त्यांना ज्या जातीयवादी नेत्यांनी उभे केले त्यांना सुद्धा धडा शिकवण्याची खरी वेळ हीच आली आहे.

### जातीयवादी चेहऱ्यांना आगामी निवडणुकीत धडा शिकवणे गरजेचे !

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत मुस्लिम समाज बहुसंख्येने आहे. यामुळे काही जातीवादी नेत्यांनी आणि राजकीय पक्षांनी याचा राजकीय फायदा घेण्याचा दृष्टिकोन ठेवून खऱ्या आरक्षणाला हरताळ फासण्याचा प्रयत्न केला आहे. आरक्षण असलेल्या अनुसूचित जातीमधील मुलीसोबत ज्या मुस्लिमाने लग्न केले त्याला उमेदवारी ही नवी राजकीय खेळी खेळली त्या पक्षाला अन अशा जातीवादी नेत्यांना येणाऱ्या निवडणुकीत आंबेडकर प्रेमी नागरिकांसह जातीवादी नसलेल्या आरक्षण प्रेमी असलेल्या जागरूक मतदारांनी उघडपणे विरोध करून त्यांना निवडणुकीत विरोधात मतदान करून घरी बसवले पाहिजे. तरच अशा प्रवृत्ती ठेचल्या जातील अन्यथा अशा प्रवृत्तींना अधिक उजाळा मिळेल आणि खऱ्या आरक्षणवाद्यांवर अन्याय होईल

---

## कासारी येथे सदगुरु बाबा यात्रेनिमित्त रंगला
# जंगी कुस्त्यांचा सामना

### गावकऱ्यांच्या वतीने भव्य दंगलीचे आयोजन,हजारो भाविकांची दर्शनासाठी रीघ



दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील कासारी येथे प्रतिवर्षी प्रमाणे सदगुरु बाबांची यात्रा याही वर्षी धार्मिक, प्रसन्न वातावरणात भरवण्यात आली. जागृत देवस्थान म्हणून प्रख्यात असलेल्या सदगुरु बाबांच्या दर्शनासाठी शनिवार ते सोमवार या तीन दिवसांच्या यात्रेत हजारोंच्या संख्येने भाविक भक्तांनी हजेरी लावत दर्शन घेतले. सोमवारी कुस्त्यांच्या भव्य दंगली चे आयोजन समस्त गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले होते.

येथील डोंगराच्या पायथ्याशी जिल्हा- परजिल्ह्यातील मल्लांनी कुस्त्यांचा फड चांगलाच रंगवला. रविवारी सकाळी गाड्या ओढण्याचा कार्यक्रम तर सायंकाळी सद्गुरु बाबांच्या पादुका असलेली पालखी मंदिर ते कासारी गाव अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली. तत्पुर्वी महाप्रसादाचे आयोजन समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते. गावासह परिसरात

(उर्वरीत पान २ वर)

## उपमुख्यमंत्री अजितदादा, उमेदवारांनी
# किडनी विकुन पैसा द्यायचा का ?



माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार संतोषबापु जेथलिया यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना एक खरमरीत पत्र थेट घरी पाठवले आहे. ते पत्र वाचकांसाठी आणि अजित दादांनी देखील दखल घेऊन वाचावे यासाठी प्रसिद्ध करत आहोत. पक्षात चारित्र्य संपन्न, गुणवान अभ्यासु, नेतृत्व गुण, निष्ठावान कार्यकर्ते यांनी तिकीट मागितले की पैशाची कारणे पुढे केली जातात. आम्ही काय किडनी विकुन पन्नास लाख, एक कोटी, तीन कोटी आणायचे का ? आपण पैश्यासाठी वाळु माफीच्या,भु माफीया,दारू माफीया, गुत्तेदार, ठेकेदार यांनाच उमेदवारी देणार का ?

लक्ष द्या , ऐकुन घ्या साहेब ,कार्यकर्ते नष्ट होत चालले आहेत.कुणी लिहीत नाही बोलत नाही.हा भाग वेगळा, कमी जास्त महायुतीच्या कार्यकर्ते यांचे सगळयाचे हेच हाल आहेत. पण बोलायची लाज वाटते.फक्त सत्तेची फळे स्वता चाकु नका.आमच्या सारख्या कार्यकर्ते पवार घराण्यावर निष्ठावान,केस पांढरे होई पर्यंत आयुष्य पणाला लावले यांची जाणीव ठेवा. तुमचे लेकरं फार भारी, मोठ्या गाडीत बसले की लयीभारी,आमचे लेकरं अष्टपैलू चौफेर हुशार ही काहीच नाही. ही परिस्थिती आहे. प्रश्न विचारला की फक्त परत दणकाटुन बोलणे म्हणजे विकास नाही.आख्यं आयुष्य पवार घराण्याला प्रचंड उंचीवर घेऊन जाण्यासाठी लाखो, करोडो कार्यकर्ते बरबाद झाले.त्यापैकी मी एक आहे. चार टगे आजुबाजुला फिरतात म्हणजे सर्वस्व नव्हे.गाव कुसाचा , आत्महत्या करणारा कार्यकर्ता याच्या कडे कोणी पाहणार आहे का नाही ?

## छाननीदरम्यान नगरसेवक पदाच्या ३६ तर अध्यक्ष पदाचे ४ उमेदवारांचे अर्ज बाद




प्रतिनिधी । धारूर

नगरपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी दाखल करण्याची अंतिम तारीख १७ नोव्हेंबर होती. अध्यक्षपदासाठी १६ आणि नगरसेवक पदांच्या २० जागांसाठी एकूण १६७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. आजपासून उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया सुरू झाली असून पहिल्याच दिवशी छाननीदरम्यान अध्यक्ष पदाचे चार व ३६ उमेदवारांचे अर्ज त्रुटी आढळल्याने बाद करण्यात आले.यामध्ये भाजपाच्या प्रभाग क्रमांक १०(ब) येथील अजय गायसमुद्रे यांच्या अर्जाचाही समावेश असल्याची माहिती निवडणूक विभागाकडून मिळाली आहे.

कागदपत्रांतील विसंगती, आवश्यक पुराव्यांची कमतरता आणि तांत्रिक चुका या कारणांमुळे संबंधित अर्ज अपात्र ठरवण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.अध्यक्ष पदासाठी १६ अर्ज आले होते यातील ४ अर्ज बाद ठरले असून १२ अर्ज पात्र ठरले आहवत तर २० उमेदवारासाठी १६७ अर्ज आले होते यातील ३६ अर्ज बाद ठरले असून १३१ अर्ज पात्र ठरले आहेत.छाननी प्रक्रियेनंतर अपात्र ठरलेल्या उमेदवारांना दाद मागण्यासाठी निर्धारित कालावधीत अपील करण्याची संधी उपलब्ध आहे. दरम्यान अर्ज बाद झाल्यानंतर काही प्रभागांत राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता चर्चेत आली आहे. निवडणूक प्रक्रियेने आता वेग पकडला असून शहरातील वातावरण अधिकच तापले आहे.

## बीड सायबर पोलीसांची विशेष कामगीरी-दोन आरोपी अटक



बीड ।प्रतिनिधी

सायबर पोलीस ठाणे बीड येथे ऑनलाईन फसवणुक गु.र.नं. ८६/२०२४ कलम ४२०,३४ भा.द.वी सह कलम ६६,६६ (क) आय.टी. ॲक्ट २००० अन्वये दाखल गुन्ह्यातील दोन आरोपींना सायबर पोलीस स्टेशन बीड येथिल पथकाने विमाननगर पुणे येथून अटक केली आहे. यामध्ये आरोपी नामे अक्षय छगन येटाळे वय. ३२ वर्ष रा. शहागड ता. जालना व राजेश गणेश चव्हाण वय. ३० वर्ष रा. घनसावंगी जि. जालना हे दोघे शेअर बाजारात कमी वेळेत (फॉरेक्स ट्रेडींग) मध्ये जास्त परताव्याचे आमिष दाखवुन तक्रारदार बाबासाहेब कांबळे रा. गेवराई बीड यांची ५,००,०००/-रु (पाच लाख रुपये) ची आर्थीक फसवणुक करण्यात आली होती.तक्रारदाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सायबर पोलीसांनी तांत्रीक विश्लेषण व डिजीटल पुरावे गोळा करुन आरोपींचा शोध घेण्यात आला. या तपासातुन फसवणुक करणा-या दोन आरोपीना विमाननगर पुणे येथुन अटक करण्यात आली पुढील तपास सुरु असुन गुन्ह्यात इतर कोणी सहभागी आहे काय तसेच अजुन किती लोकांची फसवणुक करण्यात आली आहे याची सखोल चौकशी करण्यात येत आहे.हि कारवाई मा. पोलीस अधीक्षक बीड, अपर पोलीस अधीक्षक बीड, उपविभागीय पोलीस आधिकारी बीड यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणे बीड चे पोनि निलेश केळे, सपोनि संदिप अराक, सफौ भारत जायभाये, पोह विजय घोडके, पो.अं.निलेश उगलमुगले, पो. अं. श्रीक्रष्ण टेकाळे तसेच तांत्रिक विश्लेष कक्ष येथील अश्विनकुमार सुरवसे यांच्या पथकाने केली. बीड जिल्हा पोलीसांचे नागरीकांना आवाहन आहे की, शेअर मार्केटमध्ये जास्त परतावा, खात्रीशीर नफा अशा प्रकारच्या आमीषावर विश्वास ठेवु नये.

## केज तालुक्यातील तलाठी कार्यालयात तलाठीच उपलब्ध नाहीत,बंद कार्यालयामुळे शेतकरी हैराण



केज/प्रतिनिधी

केज शहरातील आणि तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालले असताना प्रशासनातील बेफिकिरी मात्र काही केल्या कमी होताना दिसत नाही.एका इमारतीत तब्बल चार पाच तलाठी कार्यालये कार्यरत असतानाही, वेळेवर एकाही तलाठी किंवा कर्मचाऱ्यांची उपस्थिती दिसत नाही. शिंदी सज्जा,बोरगाव सज्जा तसेच इतरही सर्व काही सज्जांमध्ये हीच परिस्थिती वारंवार पाहायला मिळत आहे. त्यामुळे आधीच पावसाने होरपळून गेलेल्या आणि आर्थिक संकटाला सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांचे हाल अधिकच वाढले आहेत.अलीकडेच पावसा मुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले. शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत.सरकार कडून अनुदान वितरणाची प्रक्रिया सुरू असली तरी प्रत्यक्षात अनेकांनाअद्याप एक रुपयांचे सुद्धा अनुदान मिळालेले नाही. याचबरोबर केवायसी पडताळणीच्या याद्या सुरु आहेत,परंतु कर्मचारी गैरहजेरीमुळे हा प्रक्रियेचा वेग अक्षरशः ठप्प झाला आहे.केज येथील तलाठी कार्यालयाचे दरवाजे बहुतेक दिवशी लॉक अवस्थेत दिसत असल्याने नागरिकांना वारंवार हुलकावणी मिळत आहे.

ग्रामीण भागातील लोकांना महत्त्वाच्या कागदपत्रांसाठी ७/१२, फेरफार,पीक नोंदणी, अनुदान प्रस्ताव यासाठी तलाठी कार्यालयावर दैनंदिन अवलंबून राहावे लागते.परंतु कर्मचारी वेळेवर उपस्थित रहात नसल्याने अनेकांना दिवसभर प्रतीक्षा करून ही काम न होता परतावे लागत

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# चीनशी करारामुळे अमेरिकेचा जीव भांड्यात!

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात अलीकडेच करार झाला. दोन महासत्तांचे प्रमुख सहा वर्षांनंतर भेटले. वादग्रस्त मुद्दे बाजूला ठेवून सध्याच्या तातडीच्या प्रश्नांतून त्यांनी मार्ग काढला. दोन महासत्तांत झालेल्या वाटाघाटींनी जगाने सुटकेचा नि:श्वास टाकला आहे. अर्थात या करारातून पहिल्या क्रमांकाची महासत्ता दुसऱ्या क्रमांकाच्या महासत्तेपुढे नमली, असा अर्थ काढला जात आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग सहा वर्षांनी भेटले आणि दोन्ही महासत्तांमधील बैठक महत्त्वाची होती. संपूर्ण जगाचे या बैठकीवर लक्ष ठेवले होते. हे नेते अलीकडेच दक्षिण कोरियातील बुसान विमानतळावर भेटले आणि त्यांची बैठक शंभर मिनिटे चालली. बैठकीपूर्वीच ट्रम्प यांना बैठक यशस्वी होईल, असा विश्वास होता. त्यामागे कारणही तसेच होते. अमेरिकेला चीनबरोबर वाटाघाटी करून 'रेअर अर्थ मॅग्नेट'च्या आयातीचा आणि सोयाबीनच्या निर्यातीचा प्रश्न सोडवणे जास्त महत्त्वाचे होते. अमेरिकेच्या शेतकऱ्यांचा तसेच तंत्र उद्योगाचा मोठा दबाव ट्रम्प यांच्यावर होता. दोन महासत्तांच्या प्रमुखांच्या भेटीनंतर अमेरिकेच्या अध्यक्षांनी मोठी घोषणा केली. त्यात म्हटले होते, की चीनमधून येणाऱ्या वस्तूंवरील एकूण सरासरी शुल्क ५७ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की अमेरिकेने चीनवर अनेक वेळा शुल्क लादले आहे. रागाच्या भरात ट्रम्प यांनी हे शुल्क जाहीर केले. ट्रम्प यांच्या मागील कार्यकाळात स्टीलवर १९ टक्के, एप्रिल २०२५ मध्ये दहा टक्के बेसलाइन शुल्क, फेंटानिलवर २० टक्के शुल्क आणि इतर शुल्क समाविष्ट होते. अशा प्रकारे अमेरिकेने चीनवर सरासरी ५५ टक्के शुल्क लादले होते. ऑगस्ट २०२५ मध्ये वाढून ते ५७ टक्के झाले. तथापि, दोन्ही नेत्यांमधील बैठकीनंतर, चीन आता सरासरी ४७ टक्के शुल्काच्या अधीन असेल. जिनपिंग यांच्याशी बोलल्यानंतर, ट्रम्प यांनी घोषणा केली, की चीनवर लादलेले फेंटानिलशी संबंधित शुल्क वीस टक्क्यांवरून दहा टक्क्यांपर्यंत कमी केले जात आहे. परिणामी अमेरिकेचा जीव भांड्यात पडला असल्यास नवल नाही.

ट्रम्प यांच्या शुल्क कपातीच्या बदल्यात जिनपिंग आता अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी करण्यास सहमत झाले आहे. चर्चेबाबतच्या इतर तपशिलामध्ये टिकटॉक कराराबाबत चर्चेचा कोणताही उल्लेख नव्हता. दोन्ही नेत्यांनी सांगितले, की ते युद्ध संपवण्यासाठी एकत्र काम करतील. दोन्ही बाजूंनी व्यापार आणि सहकार्यावर महत्त्वाचे करार केले. शी जिनपिंग फेंटानिल दरवाढ थांबवण्यासाठी कठोर परिश्रम करतील आणि अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांवर पुढील निष्कर्ष लवकरच घोषित केले जातील. 'रेअर अर्थ मॅग्नेट'वर दरवर्षी चर्चा केली जाईल. या करारानंतर इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक वाहने आणि संरक्षण उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या साहित्यांचा जागतिक प्रवेश स्थिर करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल पुढे पडले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी दुर्मीळ पृथ्वी खनिजांबाबत करार केला असल्याचे जगाला सांगत जणू सुटकेचा नि:श्वास सोडला. ट्रम्प यांनी सांगितले, की चीनने पुढील वर्षासाठी अमेरिकेला 'रेअर अर्थ मॅग्नेट' पुरवण्यास सहमती दर्शवली आहे. ट्रम्प यांनी असेही जाहीर केले, की फेंटानिल (एक अमली पदार्थ)साठी चीनवरील कर दहा टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. यासह, अमेरिकेचा चीनवरील एकूण करभार आता ५७ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. 'जिनपिंग हे खूप कठोर वाटाघाटी करणारे आहेत, ही चांगली गोष्ट नाही,' असे ट्रम्प यांनी सांगितले. या भेटीच्या निमित्ताने अमेरिका आणि चीनमधील सर्व वाद मिटले, असे त्यांनी सांगितले.

# अनेक दिवसांची मागणी असलेली रस्ता कामे पूर्ण होत आहेत,ठेकेदार आणि अधिकाऱ्यांनी दर्जेदार रस्त्यांची कामे करावीत

## कर्जमाफी जून पर्यंत करण्याची तयारी - आ.सुरेश धस

आष्टी ।प्रतिनिधी

दर्जेदार रस्त्यांची कामे झाल्याशिवाय विकासाचा मार्ग उपलब्ध होत नसल्याने गेल्या अनेक दिवसांपासून मागणी होत असलेली रस्ता कामे आज सुरू होत आहेत. जिल्हा नियोजन व विकास निधीतून ही कामे होत आहेत. संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांनी या रस्त्याचा दर्जा चांगला राहील याकडे लक्ष द्यावे आणि सर्व संबंधित गावातील गावकऱ्यांनी देखील या रस्ता कामांवर लक्ष ठेवून चांगले काम करून घ्यावे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले. आष्टी तालुक्यातील अंभोरा - नांदूर आणि खरडगव्हाण फाटा येथील रस्ता शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर, उद्धव बापू दरेकर, जयसिंग गव्हाणे, दत्तोबा वाडेकर, सुखदेव खकाळ, सागर आमले, संजय ढोबळे, अंकुश चव्हाण, सुखदेव खळाळ, रमेश गावडे, अनिल ढोबळे, अशोक इथापे, राजेंद्र दहातोंडे, रावसाहेब शिरसाठ, रामहरी महारनोर, उप अभियंता मधुकर निंबाळकर, शाखा अभियंता सुनील राठोड, शाखा अभियंता ढोबळे, रामेश्वर चव्हाण, मनोज थोरवे, जयसिंग गव्हाणे, रामहरी महारनोर, गोपाळ रक्ताटे, अमर वाळके, विकास अमृते, सरपंच सौ. मंगला विधाते, बलभीम विधाते, अजिनाथ विधाते, उद्धव विधाते हे उपस्थित होते.

आमदार सुरेश धस यांनी सातत्याने पाठपुरावा करून तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असा निधी मंजूर करून घेतला असून राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते नांदूर ७० लाख रुपये निधी, राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते अंभोरा - हिवरा - १ कोटी ५४ लाख रुपये निधी, प्रमुख जिल्हा मार्ग १ ते पारोडी - बोरोडी ३ कोटी ५० लाख रुपये निधी, लोणी ते खुंटेफळ - वाटेफळ १ कोटी रुपये निधी या चारही रस्ते कामांचा भव्य शुभारंभ सोमवार दि. १७ नोव्हेंबर रोजी पार पडला. शुभारंभ प्रसंगी परिसरातील पदाधिकारी, विद्यार्थी, नागरीक, महिला मोठया संख्येने उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, शेतकऱ्यांच्या प्रत्येक प्रश्नासाठी राज्य सरकार कटीबद्ध असून जून २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना कर्ज माफी देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तयारी दर्शवली आहे. कर्जमाफी करताना २००७ पासून असलेली जुने कर्ज प्रकरणे मागे राहतात त्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. या कर्जाबाबत निर्णय होणे आवश्यक आहे, त्यामुळे शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा यासाठी आपण मुख्यमंत्री यांना भेटणार असल्याचे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले. पुढे बोलतांना आ. धस म्हणाले, रस्ता हा दर्जेदार झाला पाहिजे अशी सर्वांनीच मागणी केली आहे आणि त्या



पध्दतीनेच हा रस्ता दर्जेदार होणार असल्याची ग्वाही आ. धस यांनी दिली. वाघळुज ते अंभोरा ह्या रस्त्याचे काम पावसामुळे दिरंगाई झाले आहे. आता लवकरच ते काम मार्गी लागणार आहे. याठिकाणी असलेल्या अंबरा या ठिकाणी पोलीस ठाणे नवीन इमारत आणि कर्मचाऱ्यांसाठी वसाहत बांधकामासाठी आठ ते दहा कोटी रुपये मंजूर होणार असून आपण त्यासाठी प्रयत्न करत आहोत. लवकरच या कामास मंजुरी मिळणार आहे. प्रस्ताव मंत्रालयात मंजुरीसाठीअसून लवकरच हे काम मार्गी लागणार असल्याचे आ. धस यांनी सांगितले. माजी आ. साहेबराव दरेकर म्हणाले की, गुत्तेदारांनी हे काम कसे चांगले करील यासाठी गावकऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. यामध्ये गट - तट बाजुला ठेऊन विकास कामांसाठी एकत्रित येण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. सरपंच सागर आमले म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले रस्त्याचे काम आ. धस यानी मार्गी लावले पण आता संबंधित गुत्तेदारांनी हे काम चांगले दर्जाचे करावे अशी मागणी सरपंच आमले यांनी केली. कार्यक्रमाची प्रस्तावना शाखा अभियंता सुनील राठोड यांनी केले. तालुक्यातील पहिली वेबसाईट असलेली ग्रामपंचायत अंभोरा सर्व कारभार ऑनलाईन पध्दतीने सुरू असून यामध्ये अंभोरा ग्रामपंचायतीचा पारदर्शी असलेला कारभार जगभरामध्ये कोणालाही पाहता यावा यासाठी अंभोरा ग्रामपंचायतची स्वतंत्र व्यवसाय निर्माण करण्यात आली आहे सरपंच सागर आमले यांच्या पुढाकाराने वेबसाईट सुरू करण्यात आली. त्या वेबसाईटचा शुभारंभ आ. सुरेश धस यांच्या हस्ते करण्यात आला. बिहार निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या अभूतपूर्व यशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना आमदार सुरेश धस म्हणाले की, राजद शासन म्हणजे जंगल राज होते, शहाबुद्दीन सारखा खासदार ऍसिड ची आंघोळ घालून माणसे मारत होता अशा पक्षाला लोक कसे मत देतील असे सवाल करून बिहारमध्ये जात - पात धर्मवीरहित भाजपाला मतदान झाले आहे. बिहारमध्ये चांगल्या कामामुळे यश. बिहारमध्ये विरोधकांच्या सभेला असलेली गर्दी मतांमध्ये बदलली नाही पण तर त्यांनी भाषणामध्ये नरेंद्र मोदी यांच्या आईला अपशब्द, मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या बद्दल खालच्या भाषेत प्रचार केल्यामुळे लोकांनी त्यांना त्यांची जागा दाखवली आहे. बिहारमध्ये चांगल्या कामामुळे यश मिळाले असल्याचे आ. धस यांनी सांगितले. या रस्ते कामांचा शुभारंभ राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते नांदूर ७० लाख रुपये निधी, राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते अंभोरा - हिवरा - १ कोटी ५४ लाख रुपये निधी, प्रमुख जिल्हा मार्ग १ ते पारोडी बोरोडी - ३ कोटी ५० लाख रुपये निधी, लोणी ते खुंटेफळ - वाटेफळ १ कोटी रुपये निधी, या चारही रस्ते कामांचा भव्य शुभारंभ आ. धस यांच्या हस्ते करण्यात आला.

नांदूर विठ्ठलाचे या ठिकाणी नदीवरील उच्चस्तरीय पुलाची आवश्यकता असल्यामुळे त्यासाठी ही प्रयत्न करण्यात येतील आणि येथील प्रसिद्ध देवस्थान कपारीचा विठोबा या ठिकाणी प्रसाद या योजनेतून भावी भक्तांसाठी भक्तनिवास स्वच्छतागृह आदी सुविधा निर्माण करण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत. लवकरच या कामांना मंजुरी मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले तर खरडगव्हाण फाटा या ठिकाणी प्रमुख जिल्हा मार्ग एक ते पारोडी बोरुडी या रस्त्याला तीन कोटी पन्नास लक्ष रुपये एवढा खर्च येणार असल्याने या परिसरातील जनतेची वाहतुकीची मोठी सोय होणार आहे तसेच सीना प्रकल्प मध्ये आष्टी तालुक्यातील गावातील जमिनी जाऊन त्यांना पाणी मिळत नसल्याची खंत जयसिंग गव्हाणे यांनी व्यक्त केली. त्याबद्दल आमदार सुरेश धस यांनी सीना प्रकल्पातील बॅकवॉटर मधून पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा दोन गुंडांना दणका

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हयातील अवैध मटका जुगार चालक व एका धोकादायक गुडाची जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांनी थेट हर्सूल कारागृहात रवानगी केली आहे. बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत त्याना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व बाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून चझऊ- व चउजउ- कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषधांने पोलीस अधीक्षकांच्या सुचनेवरुन प्रभारी अधिकारी ।. पो.नि. पो.स्टे. माजलगांव शहर यांनी दि. २१.१०.२०२५ रोजी इसम नामे शाम आप्पाराव भालेकर वय ३८ वर्ष रा. अशोक नगर माजलगांव व सपोनि चकलंबा यांनी दिनांक १०.११.२०२५ रोजी २) इसम नामे गोपाल मधुकर उनवणे वय २४ वर्षे रा. चकलंबा ता. गेवराई जि. यांचे विरुध्द चझऊ- कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतोने मा, जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसम क्रमांक। याचे विरुध्द पो.स्टे. माजलगांव शहर येथे कल्याण व मिलन मटका खेळणे



व खेळवीणे। रुपयाचे ९० रुपये देण्याचे अमिष दाखवुन बेकायदेशीर रित्या मटका जुगार चालविणे व धमक्या देणे शिवीगाळ करणे अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०५ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे या करीता त्याचेवर कलम १२९ बीएनएसएस अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती तरी त्याचे वर्तणात सुधारना झाली नाही.

सदर स्थानबध्द इसम क्रमांक २ याचे विरुध्द पो.स्टे. चकलंबा, गेवराई व शिवाजीनगर येथे खुनाचा प्रयत्न करणे, गैरकायदयाची मंडळी जमविणे, दंगा करणे, गंभीर दुखापत करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, शिवीगाळ करणे, खंडणीची मागणीक करणे या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०४ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यातील ०२ गुन्हे न्याप्रविष्ठ व ०२ गुन्हे तपासावर आहे. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे या करीता त्याचेवर कलम १२९ बीएनएसएस अन्वये प्रतिबंधक



कारवाई करण्यात आलेली होती तरी त्याचे वर्तणात सुधारना झाली नाही. सदर प्रकरणात श्री. विवेक जॉन्सन जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक १७.११.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने चझऊ- कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर दोन्ही इसमास तात्काळ ताब्यात घेवून हसूल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना संबधित पो. स्टे. प्रभारी अधिकारी व पो.नि. स्वागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा श्री शिवाजी बंटेवाड व पो. नि. राहुल सर्युतह पो. स्टे. माजलगांव शहर यांनी संयुक्त रित्या ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत गोपणीय माहीतीच्या आधारे सदर इसमांना अनु क्रमे दि.१७.११.२०२५ व १८.११.२०२५ रोजी ताब्यात घेऊन नमूद इसमांना हार्सल कारगृह, छत्रपती संभाजीनगर येथे दि. १८.११.२०२५ रोजी हजर करुन स्थानबध्द केले आहे.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत (भापोसे), अपोअ अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके, सचिन पांडकर, अपोअ बीड, उविपोअ गेवराई श्री. अनिल कटके, उविपोअ माजलगांव श्री. शैलेश गायकवाड, पोनि स्थागुशा श्री. शिवाजी बंटेवाड, यांचे मागदर्शनाखाली पो.नि. राहुल सुर्यतळ, पोउपनि केरबा माखणे, माधव तोटेवाड, संतराम थापडे, राम भंडाणे, माधव बहीरवाळ, सचिन मस्के सर्व पो.स्टे. माजलगांव शहर तसेच सपोनि संदिप पाटील, पोअं/ सोमनाथ कुलकर्णी, अमोल येळे, अरुण राउत, हनुमंत इंगोले, संदीप गायकवाड सर्व पो.स्टे. चकलंबा तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, अंकुश वरपे, विकास राठोड, गोविंद राख, नितीन वडमारे, युनुस बागवान नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या, खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर, बेकायदेशीर जुगार व लॉटरी चालवणारे व्यक्तीवर जास्तीत जास्त चझऊ- व चउजउ- कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत (भापोसे) यांनी दिले आहेत.

# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

## सामाजिक कार्यकर्ते सज्जाद सय्यद यांची मागणी

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा शहरातील मोकाट आणि भटक्या कुत्र्यांची वाढ दिवसेंदिवस भयावह स्वरूप धारण करत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ, शाळा परिसर, क्रांतीनगर, तसेच वसाहती भागात भटक्या कुत्र्यांचे थवे मुक्तपणे फिरताना दिसत आहेत. यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या शाळकरी मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच वर्गातील लोक त्रस्त झाले आहेत.

शहरातील अनेक ठिकाणी भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याच्या तसेच चावण्याच्या घटना घडल्या असून नागरिकांचा संताप वाढत चालला आहे. रात्रीच्या वेळी बाहेर पडणे तर अनेकांसाठी धोकादायक बनले असून, काही ज्येष्ठ नागरिक व महिला सकाळ-संध्याकाळची फिरणे बंद करण्यास मजबूर झाले आहेत. रस्त्यांच्या कडेला वाढलेल्या कुत्र्यांच्या संख्येमुळे वाहतुकीतही अडथळे निर्माण होत असून अपघातांची शक्यता वाढली आहे.



स्वच्छ भारत अभियानाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता आणि शहरी नियंत्रणाची चर्चा जोरात असताना, शहरातील भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यात नगरपंचायत प्रशासन अपयशी ठरल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे. नगरपंचायतीकडून अद्याप कोणतीही ठोस मोहिम, निर्बंधात्मक उपाययोजना किंवा भटकी प्राणी निवारा केंद्राबाबतचा निर्णय जाहीर झालेला नाही.सामाजिक कार्यकर्ते सज्जाद सय्यद यांनी नगरपंचायतीला तात्काळ कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या त्रासामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत आहे. प्रशासनाने तत्काळ श्वाननियंत्रण मोहीम राबवून शहरातील भीतीचे वातावरण दूर करावे. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे ही नगरपंचायतीची जबाबदारी आहे.

शहरातील नागरिकांनीही सोशल मीडियावरून वारंवार शासनाकडे मागणी करत, पाटोद्यात वाढत चाललेल्या या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात असे. सांगितले आहे. व नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे. यासाठी प्रशासनाने ठोस आणि कार्यक्षम पावले उचलावे. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा संचालक सेवा सोसायटी पाटोदा सय्यद सज्जाद यांनी केले आहे.

पान १ वरून...

**कासारी येथे सदगुरु ...**

सर्वत्र भक्तीमय व प्रसन्न वातावरण पसरलेले होते. लहानांपासून नवतरुण पहेलवानांची महाराष्ट्र केसरी शिवाजी केकान, माजी जि.प. सदस्य बाबासाहेब तिडके, पै.रामेश्वर मुंडे, युवराज ठोंबरे, बळीराम डापकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कुस्त्यांची दंगल रंगली.

दहा रुपयांपासून ५ हजार रुपयांची बक्षिसे दंगलीत जिंकलेल्या मल्लांना जाहीर करण्यात आली. शेवटची ५ हजार रुपयांची कुस्ती साय. ६ वाजता परभणीच्या वैभव खटींग व देवदहिफळच्या (ता.धारुर) लखन बडे याच्यासोबत खेळवण्यात आली. लखन बडे व वैभव खटींग यांचा विजय घोषीत करतांना पंचांनी संभ्रमावस्थेत समसमान बक्षीस वैभव व लखनला वाटप केले. बाळासाहेब बडे, सदाशिव बडे, बाबासाहेब तिडके, सरपंच दौलत बडे, माजी सरपंच शामसुंदर बडे, सुजात सय्यद, भगवान बडे, रमेश बडे यांनी पंचाची भुमिका निभावली. कल्याण घूले, मनोहर बडे,

पान १ वरून...

दत्तात्रय बडे, मधुकर बडे, गजानन जोशी, दत्ता केंद्रे, अंकुश बडे, सुनील बडे, अक्षय बडे, गोरख बडे, ज्ञानोबा बडे, समाधान बडे, कैलास बडे, सतीश तंबूड, दीपक घुले, विठ्ठल बडे आदींनी ग्रामस्थ व कमिटीच्या वतीने या दंगलीचे नियोजन केले. मातीतील कुस्तीत बाळासाहेब चौरे ची विवेक शेंडगे सोबत, धनराज केंद्रेची सोनू पवार, पृथ्वीराज वनवे ची खाजा शेख सोबत झालेल्या कुस्त्या विशेष लक्षवेधी ठरल्या. पै. महादेव मुजमुले यांनी पहाडी आवाजात कुस्तीच्या फडात सूत्रसंचालन केले.

**केज तालुक्यातील तलाठी ....**

आहे.शेतकरी स्वतःचे काम सोडून, प्रवास करून कार्यालयात येतात; पण कार्यालय बंद असल्याचे चित्र सातत्याने समोर येत आहे.यामुळे त्यांच्या मनात प्रचंड नाराजी निर्माण झाली

पान १ वरून...

आहे.या सर्व प्रकारामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष नेमके कुठे आहे? हा प्रश्न अधिक गंभीरपणे उपस्थित होत आहे. प्रशासनाच्या अशा निष्क्रियतेकडे दुर्लक्ष करत राहिले,तर केज तालुक्यातील शेतकऱ्यांच्या समस्या अधिकच बळावणार आहेत.अनुदानाच्या निधीची प्रतिक्षा करणारे शेतकरी,आधीच नैसर्गिक आपत्तीने त्रस्त असताना, आता प्रशासनाच्या दुर्लक्षा मुळे दुप्पट अडचणीत सापडत आहेत.याच संबंधी नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी घेतलेले अँगल कमेऱ्याचे फोटो देखील या परिस्थितीचे वस्तुचित्र स्पष्ट दाखवतात.कार्यालय बंद, कर्मचारी अनुपस्थित, आणि नागरिक दररोज च्या गैरसोईला कंटाळलेले आहेत अशीच अवस्था सध्या पाहायला मिळत आहे.जनतेच्या सोयीसाठी असलेली ही कार्यालये प्रत्यक्षात जनतेलाच त्रास देत असतील,तर या विरोधात ठोस पावले उचलण्याची वेळ आता आली आहे.संबंधित विभागाने तातडीने लक्ष देऊन जबाबदारी निश्चित करणे अत्यावश्यक आहे.

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९४५/२०२५**

देवी दत्तोपंत खजानदार व इतर वि.निरंक

**(मार्फत-ॲड.ए.ए.शिंदे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **जगदिश पि.पुरूषोत्तम टेकाळे, रा.खांडवी ता.गेवराई जि.बीड हे दि.०७.०८.२०२२ रोजी रा.सदर** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. देवी पि.दत्तोपंत खजानदार (लग्नाअगोदरचे नाव), अरूणाबाई भ्र.जगदिश टेकाळे (लग्नानंतरचे नाव) वय-६५ वर्षे., धंदा-घरकाम, रा.सदर, २. दिपक पि.जगदीश टेकाळे वय-३५ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर** याना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **जगदिश पि.पुरूषोत्तम टेकाळे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१७/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२४/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९३६/२०२५**

लक्ष्मण पि.दादाराव लोखंडे व इतर वि.निरंक

**(मार्फत-ॲड.आर.डी.भांबरे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **दादाराव पि.नाथा लोखंडे, रा.लोणाळा ता.गेवराई जि.बीड येथे दि.३१.१०.२०२४ रोजी** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. लक्ष्मण पि.दादाराव लोखंडे, वय-६५ वर्षे, धंदा-शेती, रा.लोणाळा ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **दादाराव पि.नाथा लोखंडे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१५/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२२/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१२२ दि.१३.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री नारायण शेषराव कणके, रा.एकलहेरा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **वडील**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेषराव शिवनाथ कनके | वडील | ०३.०१.२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३७२ दि.२४.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **गणेश विलास थोरात, रा.बोरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वरी गणेश थोरात | मुलगी | २३.०४.२०१९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी हमी भाव खरेदीचा लाभ घ्यावा:- सभापती संभाजी शिंदे

## वडवणीत सी.सी. आय कापुस खरेदीचा शुभारंभ

**वडवणी ।प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी काल दिनांक १७/ ११/२०२५ पासून लोनवळ फाटा येथील मे.एन.सी.सी.सी.जे कॉटन कुप्पा खरेदी केंद्रावर सि.सि.आयच्या वतीने कापुस खरेदी केंद्राचा शुभारंभ संभापती संभाजी तात्या शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.**



वडवणी तालुक्यातील नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांसाठी सी. सि. आयच्यावतीने कापूस खरेदी केंद्र लोणावळा फाटा येथे सुरू करण्यात आले असून याचा शुभारंभ काल वडवणी बाजार समितीचे सभापती संभाजीराव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी मा.जि.प. सदस्य औदुंबर सावंत,तालुका अध्यक्ष बजरंग साबळे,संचालक अँड. प्रदिप शेळके, नारायणराव शेळके, अमर शिंदे, अंकुश नाईकवाडे,सि.सि.आय चे ग्रेडर हर्षल पांडे,श्रीओम ट्रेडींगचे प्रदिप पांढरे,बाजार समितीचे सचिव गोविंद आधळे यांच्या सह इतर कर्मचारी व शेतकरी बांधव यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना सभापती संभाजी तात्या शिंदे यांनी वडवणी कार्यक्षेत्रातील शेतकरी बांधवांना आवाहन केले की, शेतकऱ्यांनी हमी भाव खरेदीचा लाभ घेण्यासाठी प्लेस्टोअर वरून कपास किसान ॲप डाऊनलोड करून त्यावर स्वः नोंदणी करावी. नोंदणी करताना प्रथम १) सातबारा २) सातबारा उतारावर २०२५-२०२६ मध्ये कापुस पिकाची नोंद असणे आवश्यक आहे. ३) आधार कार्ड ४) शेतकऱ्यांचा फोटो ही कागदपत्रे अपलोड करावी. तसेच आपली नोंदणी ॲप्रुल झाल्यानंतर स्वतः शेतकऱ्यांनी स्लॉट बुक करावयाचा आहे. स्लॉट बुक केल्यानंतर ज्या दिवशीचा दिनांक निवडला आहे त्याच दिवशी सदरील खरेदी केंद्रावर कापुस विक्रीसाठी घेवुन जायचा आहे.. स्लॉट बुक झाल्याशिवाय आपला कापुस खरेदी केंद्रावर घेवुन जाऊ नये. तसेच ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत कपास किसान ॲपवर शेतकऱ्यांनी स्वः नोंदणी पुर्ण करून घेण्यात यावी. असे आवाहन बाजार समिती, वडवणीचे सभापती संभाजी तात्या शिंदे यांनी केलेले आलेले आहे

# ज्ञानेश्वरी ग्रंथ हा मानवी जीवन मंदिरातील नंदादीप आहे - ह.भ.प. माधव महाराज डाके

बीड /प्रतिनिधी

येथील अंबिका चौक, पांगरी रोड, आदर्श नगर येथे शरद डहाळे यांच्या निवासस्थानी कार्तिकीवद्य एकादशी आणि माऊली ज्ञानोबारायांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'घरोघरी ज्ञानेश्वरी स्नेहभेट' या विशेष उपक्रमांतर्गत काल कार्तिक एकादशी निमित्त मोठ्या श्रद्धा व भवभक्तिने सदरील कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाला परिसरातील शेकडो भाविकांनी उपस्थित राहून अध्यात्मिक उत्सवाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाची सुरुवात सौ. राखीताई शरद डहाळे यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या औक्षणाने झाली. गंध, अक्षता व फुले अर्पण करून ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली.

या संपूर्ण उपक्रमात डहाळे परिवाराने अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे राखीताई शरद डहाळे, सौ. उषा भिवराज डहाळे, मंगेश डहाळे, सुरेश डहाळे, अथर्व डहाळे यांनी उत्तम नियोजन केले



## जन्मशताब्दी वर्षानिमित्त घरपोच 'ज्ञानेश्वरी ग्रंथ स्नेहभेट' उपक्रम

होते.या ग्रंथ भेट कार्यक्रमास ह.भ.प. मुकुंद भुतपल्ले (माजी शाखाधिकारी, कॅनरा बँक)

- योगगुरु ह.भ.प. उबाळे, डॉक्टर विक्रम सिंह कपूर, बाबा पंडित, अनिता पंडित,वृंदावनी साळुंके, यांच्यासह आदर्श नगर परिसरातील असंख्य श्रद्धावान भक्त उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या आयोजनात ह.भ.प. महादेव नाना साळुंके यांनी मोलाचे परिश्रम घेतले.पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# वडवणीतील उद्योजक दत्तात्रय आलगट यांचे निधन

वडवणी ।प्रतिनिधी



वडवणी शहरातील रहिवासी कोष्टी समाजाचे उद्योजक दत्तात्रय लक्ष्मण आलगट वय ४८ वर्षे यांचे पुणे येथे उपचारादरम्यान काल दिनांक १८ नोव्हेंबर रोजी दुःखद निधन झाले आहे. वडवणी शहरातील युवा उद्योजक हॉटेल मातोश्रीचे मालक व आलगट चिवडा निर्माते दत्तात्रय लक्ष्मण आलगट वया ४८ वर्षे हे केल्या काही दिवसापासून आजारी होते. यामध्ये त्यांच्यावर पुणे येथे हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. या उपचारा दरम्यान काल दिनांक १८ नोव्हेंबर रोजी त्यांचे दुःखद निधन झाले आहे. तरी दत्तात्रय आलगट अत्यंत शांत व मनमिळावू स्वभावाचे म्हणून वडवणी तालुक्यात सुपारीचित होते .त्यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमधून कष्टाने उद्योग उभा करून उद्योजक म्हणून ते ओळखले जात होते. तरी उद्योजक दिगाबर आलगट यांचे बंधू होते. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी,तीन मुले,सुन ,भाऊ असा मोठा परिवार आहे.

# सुदामती सोनुने या गरीब कुटुंबांना मेंदु रोगांवरील उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून दिलासा

## संकेत सानप यांच्या प्रयत्नांना यश तात्काळ ५० हजार रूपये निधी उपलब्ध





मुंबई मंत्रालय ।प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकी व लोकसेवा हाच आपला धर्म मानून काम करणाऱ्या मुंबई मंत्रालयातील आदर्श तिगावचे सुपुत्र संकेत तुकाराम सानप यांनी पुन्हा एकदा जनसेवेचा आदर्श उभा केला आहे. त्यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील गरीब व गरजू कुटुंबातील रुग्ण सुदामती चंद्रभान सोनुने या महिला भगिनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे.

सोनुने हे गेल्या काही काळापासून मेंदू रोग गंभीर आजाराशी झुंज देत असून, उपचारासाठी मोठा खर्च होत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या या कुटुंबासाठी एवढा खर्च परवडणारा नव्हता. याची दखल घेत मंत्रालय प्रतिनिधी संकेत सानप यांनी वैद्यकीय कागदपत्रांसह शासन दरबारी पाठपुरावा करून मदतीची फाईल मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे पाठवली. अखेरीस त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ५० हजार रुपयांची मदत मंजूर करून रुग्णाच्या कुटुंबाच्या हाती पोहचवण्यात आली.

या मदतीमुळे सुदामती चंद्रभान सोनुने यांच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. रुग्णालयातील वाढते खर्च, औषधोपचार व इतर वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी ही मदत उपयोगी ठरणार आहे. या निर्णयाबद्दल गावकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक जनतेकडून संकेत सानप यांचे अभिनंदन होत आहे.

सुदामती चंद्रभान सोनुने यांच्या कुटुंबीयांनी या मदतीबद्दल मुख्यमंत्री, निधी प्रमुख तसेच संकेत तुकाराम सानप यांचे आभार मानले असून गावातील नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले आहे. सामाजिक कार्य आणि जनसेवा हाच मार्ग निवडलेल्या संकेत सानप यांच्या या कार्यामुळे तरुण पिढीला प्रेरणा मिळत आहे.



# शिराढोण व्यापारी असोसिएशन अध्यक्षपदी दयानंद पाटील यांचे एकमताने निवड

कळंब /प्रतिनिधी

तालुक्यातील शिराढोण व्यापारी असोसिएशन बैठक उत्साहात पार पडली आह व्यापारी असोसिएशन अध्यक्षपदी दयानंद पाटील एकमताने निवड करण्यात आली.

उपाध्यक्षपदी संजय दादा शेळके, सचिवपदी रामेश्वर मुंदडा, कार्याध्यक्ष सतीश शिंपले, राहुल ओमने,अशोक महाजन, अखिल शेख आदि सदस्यपदी खडबडे अजय विनायक वैभव प्रमोद नानजकर रोहित महाजन संदीप गायकवाड राहुल महाजन आकाश पवार अक्षय कोल्हे अशोक महाजन प्रतीक सोनवणे दीपक ठाकूर किरण पानढवळे मार्गदर्शक देवदास महामुनी दिनेश यादव सतीश शिंपले रामेश्वर मुंदडा रमण मुंदडा शैलेश मुंदडा किशोर मुंदडा आदी उपस्थित होते.

## युसुफ वडगाव जिल्हा परिषद गटामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजीत दादा पवार)

# पार्टीने हक्काचा उमेदवार द्यावा - तालुका उपाध्यक्ष प्रितम खरात यांची मागणी

केज/प्रतिनिधी

आगामीकाळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संदर्भात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने युसुफ वडगाव जिल्हा परिषद गटामध्ये पक्षातीलच उमेदवार द्यावा जेणेकरून पक्षातील एखाद्या सर्व सामान्य कार्यकर्त्याला संधी भेटेल तसेच एखाद्या सुशिक्षित व नवीन नेतृत्वाला संधी भेटेल या दृष्टिकोनातून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे,माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांना पत्रकाद्वारे मागणी करणार असल्याची माहिती केज तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका उपाध्यक्ष प्रितम खरात यांनी दिली आहे.पक्षामध्ये काम करत असताना समाजकारण आणि राजकारण या जोडीला धरून शेतकऱ्यांचे तथा सामाजिक प्रश्न यावर नेहमी काम करणारे चळवळीतील जे नेतृत्व असतात त्यांना संधी पक्षाने देणे गरजेचे आहे



जेणेकरून पक्षाचे ताकद वाढेल या दृष्टिकोनातून पक्षाने उमेदवार हा आयात न करता जो प्रामाणिक आणि एकनिष्ठ पक्ष असे राहिलेले आहेत त्यांना संधी देऊन त्यांचा सन्मान करावा जेणेकरून पक्षाची प्रतिमा सर्व सामान्य लोकांमध्ये स्वच्छ राहील.नाहीतर असे होऊ नये की,उमेदवार सक्षम न देता एखाद्या दुसऱ्या पक्षातील उमेदवाराला सहकार्य करू नये अशी विनंती देखील प्रीतम करत करणार आहेत पक्षाकडे हे सांगण्यात आले.आपला पक्ष कसा बळकट होईल याच्या दृष्टिकोनातून उमेदवार देण्यात यावा.पुर्वी या निवडणुकीमध्ये थोड्या फरकाने प्रतिस्पर्धी उमेदवार पराभूत झाला होता या गटामध्ये पक्षाचे ताकद खूप मोठी आहे या गटामध्ये रमेशरावजी आडसकर यांचे प्राबल्य आहे शिवाय त्यांची काम करण्याची पद्धत याचा विचार केला असता येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये युसुफ वडगाव जिल्हा परिषद गट राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात येणे सहज शक्य आहे.ज्याप्रकारे कार्यकर्ता हा पक्षामध्ये संघटनात्मक बांधणी करून पक्ष वाढवण्यासाठी काम करत असतो त्याच प्रकारे त्या कार्यकर्त्याला न्याय देणे पक्षाची भूमिका असावी असे मत प्रीतम खरात यांनी मांडले आहे.. लवकरच पक्षाचे अध्यक्ष तसेच उप मुख्यमंत्री अजित दादा पवार साहेब यांना भेटून निवेदनाद्वारे मागणी करणार असल्याचे स्पष्ट त्यांनी केले आहे.

# संत तुकाराम महाराजांचे तत्त्वज्ञान जगासमोर मांडणारे कीर्तनकार ह.भ.प.डॉ.सुदाम महाराज पानेगावकर

## गुरुदेव श्री विश्वनाथ कराड आणि विश्वशांती केंद्र यांच्या कृपेची जाणीव

आष्टी ।प्रतिनिधी

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संतांनीच या राज्याला भक्तीचा मार्ग दाखवला. लोकसंगीत ही त्या प्रदेशाची ओळख असते किंबहुना वारकरी संप्रदायातून आपल्या जीवनाला एक सुसंगत आकार देऊन हजारो लाखो लोकांच्या जीवनाला वारकरी संप्रदायाचा सुगंध देऊन नवा तेजोमय प्रकाश पाडणारे कीर्तनकार म्हणून हरिभक्ती परायण डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांच्या कार्यकर्तृत्वाला आज राज्याच्या कानाकोपऱ्यातून सर्वसामान्य भक्त धन्यवाद देत आहेत.

१९७८ ते १९८१ या काळामध्ये आळंदी मध्ये वारकरी संप्रदायाच्या अत्यंत प्रामाणिकपणे शिक्षण ह. भ. प. पानेगावकर महाराजांनी घेतले. १९९१ ते ९२ या काळामध्ये ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी सोहळ्यानिमित्त श्रीक्षेत्र पैठण येथे विश्वशांतीचे कराड साहेब यांचे त्यांना दर्शन झाले. २००३ ला ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी उत्सव सोहळ्यामध्ये अर्थात २००४ मध्ये दरमहा एकादशीनिमित्त महाराजांची किर्तन सेवा ही सुरू झाली.

कीर्तनाच्या माध्यमातून वारकरी संप्रदायातून भक्तीचा मार्ग दाखवताना त्यांनी महाराष्ट्र पिंजून काढलाच; पण आंध्र प्रदेश, तेलंगणा राज्यातही त्यांनी विश्वशांतीचा प्रचार आणि प्रसार अत्यंत जोमाने आणि निष्ठेने पार केला. माऊली श्री तुकाराम महाराजांचे तत्त्वज्ञान त्यांनी जगासमोर मांडले काळ सार्थक केला आम्ही हे वाक्य त्यांच्या कार्यकर्तृत्वाला अत्यंत साजेसे आणि शोभून दिसते आहे! संतांचं मागून खावं; पण दुष्टांनी दिलेलं ही खाऊ नये असे विचार मांडणारे महाराज संसारमायेतून बाहेर निघाल्यासच भक्ती मार्गाची गोडी निर्माण होते या अनुषंगाने सेवार्थ असतात. माळकरी, वारकरी आणि कष्टकऱ्यांच्या घरचं खावं. वारी हा महाराजांचा अत्यंत आवडीचा विषय आहे. त्यांनी वारी या विषयावर झी टॉकीज या मराठी वाहिनीवर विस्तृत विवेचन केलेले आहे. महाराष्ट्रातील लाखो रसिक प्रेक्षक आणि भाविक भक्तांनी त्यांचे हे मौलिक ज्ञान ग्रहण केले आहे. अस्खलित शब्दांचा प्रतिभाषाली अविष्कार म्हणजेच ह. भ. प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर आहेत.

रौप्यमहोत्सवी वर्ष भाविकांची अलोट गर्दी! विश्व शांती केंद्र आळंदी चा २५ रौप्यमहोत्सवी वर्ष सोहळा संपन्न होत आहे. गेली २५ वर्षे डॉ. सुदाम पानेगावकर महाराज यांची कीर्तन सेवा अद्याप अखंड चालू आहे. किमान २ लाख लोक उपस्थित राहत असून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहेत.

विश्वशांती केंद्राच्या कृपेची जाणीव!

देशासह जगाला शांतीचा संदेश देणारे आणि जगाच्या कानाकोपऱ्यात भारत देशाचे शांतीच्या क्षेत्रामध्ये प्रतिनिधित्व करणारे गुरुदेव श्री विश्वनाथ कराड आणि विश्वशांती केंद्र यांनी दिलेले प्रेम याची पूर्ण जाणीव



असल्याची विनम्र प्रतिक्रिया ह. भ. प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांनी दिली.



# महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा शाळेच्या विद्यार्थिनी

## आंतरराष्ट्रीय स्तरावर जंपरोप स्पर्धेत भारतीय संघात देशाचे नेतृत्व करणार

केज/प्रतिनिधी

नुकत्याच पार पडलेल्या रीवा,मध्यप्रदेश येथे झालेल्या २२ व्याज्युनियर राष्ट्रीय जंपरोप स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघात महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा येथील खेळाडूंनी सिंगल रोप स्पीड रिले सांघिक प्रकारात वैभवी बालासाहेब सोनके, मुक्ताई अण्णासाहेब पारेकर,पल्लवी अमिताभ गोरे यांनी कांस्यपदक पटकावले आहे.

तसेच चीन किंवा थायलंड या देशात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.त्यांच्या या यशाबद्दल बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.नरेंद्र काळे सर,अध्यक्ष श्री.भागवत दादा गोरे तसेच संचालक मंडळ तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री.काकडे आर.एम सर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मार्गदर्शक श्री.मनेश गोरे सर व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या यशा बद्दल पंचक्रोशीतील सर्वांकडून शुभेच्छा व कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# गेवराईत भाजपची प्रचारलाट सुसाट

## सामान्य जनतेने प्रचार हाती घेतल्याने गीता सौ.भाभीच्या विजयाचा मार्ग सुकर



गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीची वातावरण चांगलेच तापले असून शहरातील प्रत्येक गल्लीबोळात प्रचाराची धामधूम सुरू झाली आहे. यामध्ये भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.गीताभाभी पवार यांच्या प्रचाराला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या प्रचार फेरीला मतदारांचा मिळालेला उत्साह आणि सहभाग पाहता, सौ.गीताभाभी पवारांच्या विजयाचा मार्ग सुकर झाला असल्याचे दिसत आहे.

भाजप नेते बाळराजे पवार आणि माजी मंत्री बदामराव पवार यांनी निवडणुकीसाठी आखलेले नियोजन अत्यंत काटेकोर असल्याने प्रचार मोहीम अधिक प्रभावी झाली आहे. घराघरात जाऊन मतदारांशी संवाद साधणे, कामांची माहिती देणे आणि आगामी विकास आराखड्याची मांडणी करणे हे सर्व संघटितपणे सुरू असून स्थानिक कार्यकर्त्यांसोबतच सामान्य नागरिकही स्वयंस्फूर्तीने प्रचारात सक्रिय झाले आहेत. दि.१६ रोजी गीताभाभी पवार यांनी प्रभाग क्रमांक १ मधील शिवाजी नगर, सुयोग शिक्षक कॉलनी, नगरपरिषद कॉलनी, नाईक नगर, गजानन नगर, बसवेश्वर कॉलनी, शिवाई नगरी, म्हाडा कॉलनी अशा अनेक वसाहतींमध्ये भव्य प्रचार फेरी काढली. या फेरीदरम्यान छोट्या-मोठ्या सर्वच रस्त्यांवर नागरिकांनी उत्साहाने स्वागत केले. महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत आणि तरूणांपासून व्यावसायिकांपर्यंत सर्व स्तरातील लोकांनी पवार कुटुंबीयांवर ठेवलेला विश्वास पुन्हा एकदा दृढ केल्याचे वातावरण दिसून आले.

गेवराई नगरपरिषदेत पवार कुटुंबीयांचा अनेक वर्षांचा कारभार, सर्व समाजातील नागरिकांशी असलेले त्यांनी बांधलेले स्नेहसंबंध आणि विकासाला प्राधान्य देणारी त्यांची कार्यशैली यामुळे शहरात 'भाजपमय' वातावरण अधिकच दाट होत आहे. जात-पात किंवा भेदभाव न करता वेगवेगळ्या समाजातील लोकांना एकत्र घेऊन चालण्याची पवार घराण्याची परंपरा असल्याने त्यांचा प्रभाव प्रभागात ठळकपणे जाणवत आहे.विशेष म्हणजे या वेळेस साधा प्रचार नव्हे तर जनतेचाच प्रचार गीताभाभींसाठी पुढे येत असल्याचे चित्र अधिक ठळक झाले आहे. प्रचार फेरीत दिसलेला उत्साह, मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद आणि जनतेचा आत्मीय सहवास पाहता सौ. गीताभाभी पवार यांच्या विजयाचा मार्ग अधिकच सुकर झाल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.



# आदर्श सरपंच दत्तात्रय खोटे यांना आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान

आष्टी ।प्रतिनिधी

दैनिक लोकशक्तीच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त भरलेल्या लोकशक्ती महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ या राज्यस्तरीय सोहळ्यात ग्रामपंचायत सांगवी पाटण गावचे आदर्श सरपंच दत्तात्रय (आबा) खोटे यांना आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा गौरव सोहळा उच्च प्रतीच्या मान्यवरांच्या हस्ते पार पडला. सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, गावरान मस्ती फेम वैभव कुऱ्हाडे (गंठणकुमार), ज्येष्ठ साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर, डॉ. कैलास दौंड, डॉ. दत्ताराव राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक, लोकशक्ती संपादक विजय लेंडाळकर तसेच पत्रकार जावेद शेख यांच्या शुभहस्ते सरपंच दत्तात्रय खोटे यांना पुरस्कार, स्मृतिचिन्ह व मानपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

या सन्मानाच्या क्षणी ग्रामविस्तार अधिकारी बाळासाहेब थोरवे, मुख्याध्यापक साईनाथ बोडखे, अध्यक्ष महेश भगत, बाबासाहेब भोसले, महेश खिलारे, उमेश सुरवसे, पत्रकार मारुती सत्रे, समाजसेवक तथा शिवरायांचा मुस्लिम मावळा समीर शेख या सर्वांची उपस्थिती लाभली. सरपंच दत्तात्रय खोटे यांना ग्रामीण भागातील उत्कृष्ट कार्य आणि आदर्श नेतृत्वाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला असून, सोहळ्यास उपस्थित असलेल्या सर्वांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अलहुदा उर्दू हायस्कूल बीडमध्ये एप्टीट्यूड टेस्ट व विद्यार्थी पालक यांना मार्गदर्शन



## तज्ज्ञांच्या दोन दिवसीय मार्गदर्शनातून विद्यार्थी व पालक लाभान्वित

बीड ।प्रतिनिधी

नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी, बीड द्वारा संचलित वतीने अलहुदा उर्दू हायस्कूल, बीड येथे दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मरकज़ी तालीमी बोर्ड महाराष्ट्र, यांच्या संयुक्त विद्यमाने १५ आणि १६ नोव्हेंबर रोजी दोन दिवसीय एप्टीट्यूड टेस्ट तसेच समग्र कौन्सेलिंग कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या महत्वाच्या शैक्षणिक उपक्रमासाठी बाहेरील जिल्ह्यांतून आलेल्या चार सदस्यीय तज्ज्ञ कौन्सेलरांच्या टीमने विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक प्रवासाबाबत मार्गदर्शन केले.कौन्सेलिंग टीममध्ये शेख जामील अहमद (औरंगाबाद), अमीर खान (परभणी), मोहम्मद अकबर आणि प्रा.नजम फारुकी (परभणी) यांचा समावेश होता. ही टीम विशेषरित्या याच उद्देशाने बीडला दाखल झाली होती आणि दोन दिवस विद्यार्थ्यांचा टेस्ट, परफॉर्मन्स, क्षमता व कलानुसार सखोल आढावा घेतला.टेस्टचे निकाल व विश्लेषण पूर्ण झाल्यानंतर रविवारी विद्यार्थ्यांकरिता तसेच त्यांच्या पालकांसाठी सविस्तर कौन्सेलिंग सत्र आयोजित करण्यात आले. या सत्रात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पातळी, नैसर्गिक क्षमता, कल आणि भविष्यकाळातील योग्य दिशांबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन देण्यात आले. यानंतर दुपारी ३ वाजता कौन्सेलर्स, शिक्षक आणि व्यवस्थापनातील पदाधिकारी यांची विशेष बैठक झाली. या बैठकीत दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांबाबत करण्यात आलेले निरीक्षण, वर्तन, शैक्षणिक कल, मानसिक बाजू आणि बौद्धिक गुणवत्तेचा सविस्तर अहवाल सादर करण्यात आला. ही बैठक भविष्यातील शैक्षणिक धोरण आणि नियोजनासाठी अत्यंत महत्वाची ठरली.

कार्यक्रमात नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी बीडचे पदाधिकारी सय्यद शफीक हाशमी, सय्यद मजहर कादरी, काझी मुजाहिद सिद्दीकी आणि जावेद अली खान उपस्थित होते व त्यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक डॉ. सिराज खान यांनी मरकज़ी तालीमी बोर्ड महाराष्ट्रचे सचिव सय्यद शरीफ तसेच विख्यात कौन्सेलर शेख मोहम्मद नजमुद्दीन यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. तसेच नूर सोसायटीचे नव्याने निवडलेले सचिव नसिर अहमद खान यांनी तीन दिवस केलेल्या उत्कृष्ट निवास, भोजन आणि राहण्याच्या सर्व व्यवस्थांचे विशेष अभिनंदन केले. सर्व कौन्सेलर्स, पदाधिकारी, मान्यवर आणि सहकाऱ्यांचे आभार मानताना त्यांनी सांगितले की, ही टेस्ट विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. कार्यक्रमाच्या यशात शाळेचे शिक्षक शेख मोईजोद्दीन, सय्यद रहबर, मोहम्मद रफीक, शेख अब्दुल हमीद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी शेख मसूद, यूनूस खान आणि इतर स्टाफ सदस्यांनी परिश्रमपूर्वक सहकार्य केले.

# ४५ विद्यार्थींना संगीत प्रवेशिका आणि विशारद परीक्षा देण्यापासून रोखले ?

बीड /प्रतिनिधी

संगीत प्रवेशिका, विशारद आणि इत्तर संगीत परीक्षेसाठी केंद्रावर येण्यास वाहन नादुरुस्त झाल्याने विद्यार्थ्यांना निर्धारित वेळेपेक्षा अवघे १० मिनिटे उशीर झाला. त्यामुळे संगीत परीक्षा केंद्रसंचालकाने चक्क परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी विनंती करूनही ४५ विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू दिले नाही. परमेश्वर गुट्टे नामक या केंद्र संचालकाच्या हेकेखोर आणि माणुसकीहिन वृत्तीचा विद्यार्थी आणि पालकांनी निषेध केला आहे.

बीड शहरातील सराफा लाईन भागात असलेल्या सावरकर विद्यालयाच्या शैक्षणिक संकुलात गांधर्व महाविद्यालयाच्या बीड येथील परीक्षा केंद्रावर संगीत विशारद आणि अन्य संगीताच्या परीक्षा घेण्यात येत आहेत. रविवार दिनांक १६ नोहेंबर २०२५ रोजी घेण्यात येणाऱ्या बीड येथील परीक्षा केंद्रावर एकूण १७८ विद्यार्थ्यांनी प्रवेशिका ते संगीत विशारद परीक्षेसाठी आवेदनपत्र भरले होते.गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील श्रीक्षेत्र कल्याण स्वामी संस्थानच्या मुलींच्या वारकरी शिक्षण संस्थेतील सुमारे ४५ विद्यार्थीनींनी प्रवेशिका ते संगीत विशारद परीक्षेसाठी बीड येथील केंद्रावर परीक्षेसाठी अर्ज भरले होते. रविवार दिनांक १६ नोहेंबर रोजी सकाळी ९.०० ही परीक्षा सुरू होण्याची वेळ होती. वाहन नादुरुस्त झाल्याने विद्यार्थिनींना येण्यास निर्धारित वेळेपेक्षा १० मिनिटे उशीर झाला. या मुलींनी परीक्षेला बसू देण्याची परीक्षा केंद्राचे बाह्य केंद्रसंचालक परमेश्वर गुट्टे यांना विनंती केली. तथापि हेकेखोर आणि मग्रूर असलेल्या गुट्टे यांना पाझर फुटला नाही. या विद्यार्थिनीला परिक्षेसाठी प्रवेश नाकारला. काही विद्यार्थिनीच्या पालकांना सदर प्रकरणी समजल्याने त्यांनी परीक्षा केंद्रावर धाव घेतली, या प्रकरणी विनंती केली. परंतु निष्ठूर आणि हेकेखोर गुट्टेने मनमानी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.



### ४५ विद्यार्थिनी संगीत परीक्षेपासून वंचित

संगीत प्रवेशिका ते संगीत विशारद या विविध परीक्षेसाठी घेण्यात आलेल्या बीड येथील परीक्षा केंद्रावर एकूण १७८ विद्यार्थी असल्याचे माहिती मिळाली आहे. यामध्ये चक्क पंचायत विद्यार्थ्यांना वाहन खराब झाल्यामुळे येण्यास उशीर झाला मात्र या केंद्रावर या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू दिले नाही. त्यामुळे ४५ विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिले आहेत. या झाल्या प्रकाराची चौकशी यावी, आणि परीक्षा नियंत्रक रजिस्टर यांनी यासंदर्भात दखल घेऊन पुन्हा परीक्षेसाठी तारीख देऊन या विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# बाल आनंद नगरी

## हा कार्यक्रम उत्साहात संपन्न



आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी शहरातील संस्कृती विद्यामंदिर या शाळेत बाल दिनानिमित्त बाल आनंद नगरी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित पालकवर्ग आणि शिक्षकवृंद यांनी भाजीपाला खरेदीचा व विद्यार्थ्यांनी बनविलेल्या खाद्य पदार्थांचा आस्वादही घेतला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञानावर आधारित प्रश्न विचारले व या उपक्रमाबाबत पालकांनी विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले. बाल आनंद नगरीत परिसरातील भाजीपाला - फळे, पाककृती, व्यवसाय ओळख, व्यवहार ज्ञान, मूलभूत क्रिया, नवनिर्मिती, मनोरंजन आदी आनंददायी शिक्षणाची वैशिष्ट्ये अनुभवायला मिळाली. यात भाजीपाला व फळे स्टॉल, इडली,भेळ, गुलाब जामून, ढोकळा, पाणी पूरी, समोसे, शिरा आदी खाद्यपदार्थ यांचे स्टॉल मांडण्यात आले होते. सदर आनंद नगरीला पालकांनी भेट देत खरेदी केल्याने विद्यार्थ्यांच्या आनंदात भर पडली. या आनंद नगरीत हजारो रूपयांची उलाढाल झाली. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे संचालक अशोक तांबे सर, सौ. शीतल तांबे मॅडम, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# दंडवतलीलास्मृती ग्रंथ प्रकाशन सोहळा थाटात संपन्न

बीड ।प्रतिनिधी

श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधीच्या सोहळ्याचे अवचित्य साधून शांतीब्रह्म श्री.संत एकनाथ महाराजांचे पट्टशिष्य असलेले श्री दंडवत स्वामी ( माधव ) यांच्या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा दिनांक १६/११/२०२५ रोजी आळंदी येथील अमृतनाथस्वामी मठामध्ये संपन्न झाला.

या दंडवत स्वामी (माधव) यांच्या वंशपरंपरे मध्ये केशवभट्ट, नारायणभट्ट, व्यंकट, गोविंद, रामचंद्र , धर्मदेव, शाहुदेव , त्र्यंबक (राजाभाऊ) , अनंतदेव, आता त्यांचे विद्यमान वंशज श्रीक्षेत्र नवगण राजुरी येथील महाराष्ट्रातील प्रसिद्ध ज्येष्ठ कीर्तनकार अमृत महाराज जोशी (आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज) हे आहेत. व तसेच लिंबागणेश येथील पूर्ण भक्त श्री अनंत प्रल्हाद महाराज यांच्या देखील कार्याची माहिती देणाऱ्या संदर्भ ओव्या या ग्रंथाद्वारे आपल्याला पाहावयास मिळतात व लिंबागणेश परिसरात असलेले श्री भगवान भालचंद्र यांचे पुरातन व प्राचीन या मंदिराची माहिती देणारा या ग्रंथामध्ये अनेक असे प्रसंग आपल्याला पहावयास मिळतात. धर्मगुरू अमृताश्रम स्वामी महाराज यांनीच केशवकृत- दंडवतलीला स्मृती ग्रंथ प्रकाशित केला आहे. या ग्रंथाचा



प्रकाशन सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. त्यावेळी श्रीगुरु चैतन्य महाराज देगलूरकर, माधवदासजी राठी महाराज, विकासानंद महाराज मिसाळ, लोकेशचैतन्य पंढरपूर, संतोषानंदजी शास्त्री, श्री पुरुषोत्तम महाराज पाटील, कृष्णा महाराज चवरे, जयेश महाराज भाग्यवंत, रामराजे राक्षसभुवनकर. इत्यादी संत महंतांच्या व भाविकांच्या उपस्थिती मध्ये ग्रंथ प्रकाशन झाले.

# देवदहिफळ येथे खंडोबा म्हाळसाची तेल भंडारा लावून महापुजा

## दिंद्रुडच्या काटकर वाड्यात मानाची काठी उभा



दिंद्रुड ।प्रतिनिधी

श्री.मल्हारी माळसाकांत देवस्थान देवदहिफळ येथे श्री. खंडोबा घटस्थापना व तेल-हळद लावण्याचा कार्यक्रम (१८ रोजी) मंगळवारी दुपारी धार्मिक वातावरणात पार पडला. देवदहिफळ सह परिसरातील भाविक भक्तांची या प्रसंगी उपस्थिती होती. देवदहिफळ येथील खंडोबाचे अनादी काळापासून सुप्रसिद्ध जागृत देवस्थान आहे. मार्गशीर्ष चंपाषष्ठी ते मकर संक्रांत या काळात येथे मोठी यात्रा भरते. याच औचित्याने मंगळवारी दुपारी श्री खंडोबा व म्हाळसा या दैवताला तेल व भंडारा लावण्याचा धार्मिक कार्यक्रम देवदहिफळ ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आला. येथील मानकरी पुजारी बाळू जगताप यांच्या हस्ते महाअभिषेक करण्यात आला. याप्रसंगी देवदहिफळ व परिसरातील भाविक भक्त उपस्थित होते. बुधवार (दि.२६ रोजी) रोजी श्री खंडोबा व म्हाळसा यांचे लग्न सूर्योदयापूर्वी लावण्यात येईल. यानंतर जवळपास दीड महिन्याची यात्रा देव दहिफळ येथे भरणार असून त्याच्या नियोजन बैठकीचे आयोजन देवदहिफळ ग्रामस्थांच्या वतीने मंगळवारी सायंकाळी करण्यात आले होते. राज्यभरातून भाविक भक्त या यात्रेला उपस्थिती दर्शवतात.

दिंद्रुड येथील मानाची काठीला तेल भंडारा

दिंद्रुड येथील काटकर परिवाराच्या वतीने देवदहिफळ येथील खंडोबा मंदिरात खंडोबा यात्रेनिमित्त मानाची काठी उभा केली जाते. मार्गशीर्ष शु. त्रयोदशी मंगळवारी या काठीला काटकर वाड्यात तेल भंडारा व महापुजा करत काठी उभा करण्यात आली असून पुढील आठ दिवस दररोज सायंकाळी आरतीचा वाजत गाजत कार्यक्रम करण्यात येतो. चंपाषष्ठीच्या आदल्या दिवशी दिंद्रुड ते देवदहिफळ वाजत गाजत या काठीचे प्रस्थान देवदहिफळ येथे करण्यात येते.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# घुंगर्डे हादगाव येथे देहात गहू बियाणे मार्गदर्शन चर्चासत्र उत्साहात संपन्न

शहागड /प्रतिनिधी :- दि. १८ नोव्हेंबर २०२५ भारतातील अग्रगण्य कृषी-तंत्रज्ञान संस्था देहात आणि घुंगर्डे हादगाव येथील सुप्रसिद्ध सोहन कृषी उद्योग सेवाचे संचालक गणेश फिस्के यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च-गुणवत्तेच्या DeHaat गहू वाणांवर भव्य मार्गदर्शनपर चर्चासत्र अत्यंत उत्साहात पार पडले. अंबड तालुक्यातील २०० हून अधिक प्रगतशील शेतकऱ्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद दिला.उच्च चव, उत्तम उत्पादन ऊथ्रड मालिकेतील वाणांना शेतकऱ्यांची पसंती




कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक देहातचे महाराष्ट्र राज्य डेप्युटी जनरल मॅनेजर विशाल राजेभोसले यांनी DWS 555 व DWS 777 या दोन्ही वाणांची वैशिष्ट्ये सविस्तर मांडली.

DWS 777 वाणाबाबत त्यांनी सांगितले की लांब व चमकदार दाणा गडद,गव्हाळ रंग,उत्कृष्ट चव,न पडणारा व न लोळणारा १००० दाण्यांचे वजन तब्बल ४८ ग्रॅम तर ऊथ्रड ५५५ बाबत. बुटका आणि ठोस दाणा सुप्रसिद्ध चझ सिहोर शरबती दर्जाची उत्कृष्ट चव

उच्च उत्पादनक्षमता १००० दाण्यांचे वजन ४६ ग्रॅम ही सर्व वैशिष्ट्ये लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी या वाणांची निवड करावी असे आवाहन त्यांनी केले.देहातची शेतकरी-केंद्रित भूमिका अधोरेखित देहातचे जालना मॅनेजर रोहित पाटील यांनी संस्थेच्या शेतकरी-केंद्रित सेवांचा आढावा घेताना सांगितले की, बियाण्यांपासून बाजारपेठेपर्यंत शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी देहात सातत्याने कार्यरत आहे. शेतीमालाला योग्य बाजारभाव मिळावा यासाठीही संस्था कटिबद्ध आहे. असिस्टंट मॅनेजर महेश कोल्हे यांनी देहातच्या नव्या पिढीतील क्रांतिकारी मका वाणांची सविस्तर माहिती शेतकऱ्यांपुढे मांडली.उत्कृष्ट उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान कार्यक्रमात या हंगामात देहातच्या वाणांपासून भरघोस गहू उत्पादन घेणाऱ्या १० यशस्वी शेतकऱ्यांचा सत्कार करून त्यांना गौरवण्यात आले.

याशिवाय देहाततर्फे २०००१ लकी ड्रॉ बक्षिसांची घोषणा करून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण करण्यात आले.भव्य उपस्थितीने कार्यक्रम यशस्वी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विकास सोसायटीचे चेअरमन प्रल्हादसिंग परिहार होते.

तसेच प्रगतशील शेतकरी उद्धवसिंग पवार, लक्ष्मण काकडे, रामेश्वर शेंडगे, सावता काळे यांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाला विशेष उजाळा दिला.घुंगर्डे हादगाव येथे झालेल्या या चर्चासत्रामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना अत्याधुनिक गहू बियाण्यांबद्दल महत्त्वपूर्ण माहिती मिळाली असून, या हंगामात DWS 555 व DWS 777 वाणांची निवड मोठ्या प्रमाणात वाढेल, असा अंदाज व्यक्त होत आहे.

# आपल्या वर्तनातून मुल्य प्रवाहित होतात -डॉ.योगेश सुरवसे

केज/प्रतिनिधी

केज शहरातील साने गुरुजी निवासी विद्यालयात जिल्हाशिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई यांच्या वतीने मुल्यवर्धित ३.० च्या दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन संपन्न झाले.या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर उद्घाटक म्हणून बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळाचे अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड, प्रमुख अतिथी म्हणून वरिष्ठ अधिव्याख्याता श्री. देशमुख सर,जयपाल कांबळे सर,मुथा फाउंडेशनचे सचिन सर, गर्जे सर,प्रा.डॉ.कविता कराड मॅडम आदि मान्यवर उपस्थित होते. दुसऱ्या टप्प्याच्या अध्यक्षस्थानावरून श्री. सुरवसे सर बोलताना म्हणाले की,मुलांमध्ये मुल्य ही उपजतच असतात त्यांना वर्धित करण्याच काम आपलं आहे.मुल्य ही प्रत्येकाच्या वर्तनातून प्रवाहित झाली पाहिजेत.प्राचीन काळा पासून मुल्य शिक्षण दिले जाते.यात नैतिक मूल्ये सामाजिक मुल्य अशा विविध मुल्ये




ही विद्यार्थ्यांच्या वर्तनातून प्रवाहित झाल्यासच ख-या अर्थाने मुल्यवर्धन झाले असे म्हणता येईल. अन्यथा दुटप्पी पद्धतीचे शिक्षण होईल असे मत त्यांनी व्यक्त केले.भुदान चळवळीत विनोबा भावे यांनी हजारो हेक्टरजमीन दान दिली हे एक नैतिक मुल्यच होय असे मत त्यांनी व्यक्त केले तर उद्घाटन प्रसंगी अँड. उद्धवराव कराड यांनी विविध उदाहरणे देऊन मुल्यांच्या संवर्धना बरोबर मुल्यवर्धन होणे काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुथा फाउंडेशनचे सचिन सर यांनी देखील उपस्थित सर्वांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचे प्रमुख जयस्वाल कांबळे सर यांच्या उत्कृष्ट नियोजनाचे कौतुक ही या प्रसंगी करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन अरुण शिंदे सर यांनी केले तर आभार प्रा.डॉ.कविता कराड-गित्ते मॅडम यांनी केले.

# नसरीन बागवान यांची राष्ट्रवादी महिला काँग्रेस शरदचंद्र पवार गट बीड जिल्हाध्यक्षा पदी नियुक्ती

केज ।प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी महिला काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या बीड जिल्हाध्यक्षा पदावर नसरीन बागवान यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या नियुक्तीचे पत्र राष्ट्रीय अध्यक्ष मा.खा. शरदचंद्रजी पवार,महिला राष्ट्रीय अध्यक्षा फौजीया खान,तसेच खासदार बजरंग बाप्पा सोनवणे आ.जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.या नियुक्तीद्वारे पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाला गती मिळणार असून,बागवान यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी सदैव



प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. राष्ट्रीय अध्यक्ष मा.खा. शरदचंद्रजी पवार,राष्ट्रीय कार्याध्यक्षा व संसदरत्न खा.सुप्रियाताई सुळे, महिला राष्ट्रीय अध्यक्षा फौजीया खान,आ. जयंतराव पाटील तसेच प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे यांच्या मार्गदर्शना खाली पक्षाला नवचैतन्य मिळावे या हेतूने त्यांनी काम करण्याची तयारी दर्शवली आहे.पक्षाचीध्येय धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व पक्ष बळकटीसाठी आपले पूर्ण सहकार्य राहील,असा विश्वास नव्याने नियुक्त झालेल्या जिल्हाध्यक्षा नसरीन बागवान यांनी व्यक्त केला.त्यांच्या नियुक्तीबद्दल त्यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# तुम्ही शहराचा विकास केल्याची दवंडी देतात मग तुम्हाला बदामरावच्या कुबड्याची गरज का?- माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराईकरांना विकास काय असतो तो कसा करावा लागतो हे विजयसिंह पंडित आमदार झाल्यानंतर त्यांनी अकरा महिन्यातच दाखवून दिले आहे. अन तुम्ही बार बार म्हणतात आम्ही गेवराई शहराचा विकास केला तर तुम्हाला बदामराव पंडित यांच्या कुबड्यांची गरज का ? लागते. तुम्ही या अगोदर ही एक होतात आताही एकच आहात त्यामुळे जनता तुमच्या भूलथापांना बळी पडणार नसून माझी पत्नी सौ. शितलताई महेश दाभाडे ह्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळ या चिन्हावर नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवत असून गेवराईकरांनी त्यांच्यासह सर्व उमेदवारांना भरभरून मतदान रुपी आशीर्वाद द्यावे असे आव्हान माजी नगराध्यक्ष महेश अण्णा दाभाडे यांनी केले आहे.

माजी नगराध्यक्ष महेश अण्णा दाभाडे हे राष्ट्रवादी काँग्रेस च्या उमेदवारांच्या प्रचारादरम्यान प्रभागात मतदारांच्या गाठीभेटी घेत असताना म्हणाले की, बदामराव पंडित व पवार हे पूर्वीपासून एकच आहेत एका नाण्याच्या दोन बाजू इलेक्शन संपले की आम्ही अलग अलग आहोत असं लोकांना भासवतात परंतु इलेक्शन लागले की दोघेही आतून एक होतात व मतदारांची दिशाभूल करतात त्यामुळे गेवराईकरांनी त्यांच्या भुलथापांना बळी पडू नये पवार कुटुंबीय वेळोवेळी आम्ही गेवराईचा विकास केला असं म्हणतात खरंच तुम्ही जर विकास केला असेल तर तुम्हाला बदामराव पंडित यांच्या कुबड्याची गरज काय? त्यामुळे तुमचा विकास काय आहे हे जनतेने ओळखून घेतले आहे असे प्रचारादरम्यान महेश दाभाडे म्हणाले असून, पुढे बोलताना ते म्हणाले की, माझी पत्नी सौ.शितलताई महेश दाभाडे ह्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा गटाकडून मा. आमदार अमरसिंह पंडित व आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली घड्याळ या चिन्हावर नगराध्यक्ष पदासाठी उभा आहे. विजयसिंह पंडित यांनी आमदार झाल्यापासून १२ महिन्यात गेवराई शहरात विकास काय असतो हे दाखवून दिले आहे. त्यामुळे आपण शितलताई दाभाडे यांच्यासह सर्वच राष्ट्रवादी काँग्रेस च्या उमेदवारांना मतदान रुपी आशीर्वाद देऊन भरघोस मतांनी विजयी करा असे आव्हान महेश दाभाडे यांनी केले असून कोणालाही काही अडचणी आल्यास मला कधीही कळवा किंवा माझ्याशी संपर्क साधा मी सदैव तुमच्या पाठीशी उभा राहील अशी गवई त्यांनी मतदारांची बोलताना दिली.

पाटोदा-जवळला फाटा(शंभरचिरा) रस्त्याचे बोगस काम दिलेल्या आश्वासनाप्रमाणे सुरू न झाल्यामुळे

# ५ डिसेंबरला उपोषणाला बसणार : अॅड. नरसिंह जाधव

पाटोदा (प्रतिनिधी): प्रधानमंत्री ग्रामसडक योजना या ६.६१ कोटींच्या रस्त्यावरील कथित निष्कृष्ट दर्जाच्या कामाबाबत केलेल्या तक्रारीवर आजवर कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव आणि शेख मोबिन यांनी ५ डिसेंबर २०२५ रोजी तहसील कार्यालय पाटोदा येथे एकदिवसीय उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

जाधव यांनी ०९ जुलै २०२५ आणि ०३ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या तक्रारीत रस्ता इस्टिमेटप्रमाणे न करता, सबलेट पद्धतीने उथळ, निकृष्टरीत्या व अंदाजपत्रकविरोधी केला असल्याचे पुराव्यासह नमूद केले होते. रस्ता केवळ एका महिन्यात उखडला असून, ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांनी मिळून सुमारे ६.५० कोटी रुपयांचा अपहार केल्याचा गंभीर आरोपही जाधव यांनी केला आहे.



या तक्रारीनंतर कार्यकारी अभियंता, झचत्रद्धध बीड यांनी पावसाळा संपल्यानंतर चांगल्या दर्जाच्या ठेकेदाराकडून मानकाप्रमाणे नवे काम करून घेण्यात येईल असे आश्वासन दिले होते. मात्र, पावसाळा संपूनही अद्याप कोणतीही दुरुस्ती, पुनर्बांधणी किंवा कारवाई न केल्याचा आरोप जाधव यांनी केला आहे.

जाधव यांनी दोषींवर प्रशासकीय व फौजदारी कारवाई, जनतेच्या पैशातून वाया गेलेली भरपाई वसूल करणे आणि रस्ता अंदाजपत्रकाप्रमाणे नव्याने करणे या मागण्या वारंवार केल्या. परंतु, वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ग्रामविकास मंत्रालयापर्यंत सर्व स्तरांवर निवेदने पाठवूनही कारवाई न झाल्याने आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला.

सरकारी खात्यांनी दिलेले आश्वासन पाळले नाही. जनतेचा सहा कोटींहून अधिक निधी वाया घालवणाऱ्या अधिकाऱ्यांवर व ठेकेदारावर कारवाई न झाल्यास हा लढा आणखी तीव्र करू, येत्या ५ डिसेंबर रोजी तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय उपोषण दि. १६.११.२०२५ रोजी यांनी तहसीलदार व झचत्रद्धध चे संबंधित अधिकारी यांना निवेदन दिले आहे. या निवेदनावर राष्ट्रवादी श.प. तालुकाध्यक्ष आनंद जाधव, उ भा.ठा तालुकाध्यक्ष मुकुंद शिंदे, काँग्रेस तालुकाध्यक्ष राहुल जाधव, भाई विष्णुपंत घोलप, मुखराम पठाण, रियाज सय्यद, महादेव जाधव, सय्यद आमेर, सय्यद यासीन, सय्यद अर्षद, राजेंद्र जाधव, अशा इतर २६ लोकांनी सह्या केल्या आहेत. या उपोषणाने शासनाचे लक्ष वेधले जाईल असे ड. नरसिंह जाधव म्हटले आहे.

# जयपूरीया मंदिरात ध्यान कार्यक्रम संपन्न; भारतीय मजदुर संघाचे राष्ट्रीय महामंत्री चरणसिंहजी यांची उपस्थिती

मुंबई/प्रतिनिधी

दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी जयपूरिया मधील मंदिरात आयोजित ध्यान कार्यक्रमाला भारतीय जनता मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री व दिल्ली प्रदेश प्रभारी चौधरी चरणसिंहजी यांनी उपस्थिती लावून या कार्यक्रमाची शोभा वाढवली.हा कार्यक्रम भारतीय जनता मजदूर संघाच्या आरोग्य चिंतन व शक्तिकरण मंडळाच्या दिल्ली प्रदेश प्रभारी सुश्री छत्रवती यांच्या मार्गदर्शना खाली यशस्वीपणे पार पडला. ध्यान सत्रानंतर आपल्या मनोगतात चौधरी चरणसिंह जी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सुश्री छत्रवती व सर्व आयोजकांचे अभिनंदन केले.तसेच उपस्थित श्रध्दावानांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. भारतीय जनता मजदूर संघाच्या कार्याची




वाढती पावले अधोरेखित करत महाराष्ट्र राज्याच्या वतीने राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके यांनी राष्ट्रीय महामंत्री चरणसिंग जी यांना हार्दिक शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे. ध्यान,आरोग्य व संघटन बांधणी यांच्या माध्यमा तून संघाच्या बळकटी करणासाठी असे उपक्रम प्रेरणादायी असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

# कारखानदारांची मस्ती शेतकऱ्यांनी उतरावी जो देईल भाव त्याला द्या ऊस-दत्ता वाकसे

प्रतिनिधी @ बीड

## प्रकाश सोंळके यांच्या कारखान्याने शेतकऱ्याची वाट लावली..

बीड जिल्ह्यातील माजलगाव मतदारसंघ अंतर्गत विद्यमान आमदार प्रकाश सोळुंके यांच्या सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना या कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम आणि धंदा विद्यमान आमदार करताना दिसत आहेत सध्या परिस्थिती बघितली तर सगळ्यात जास्त कारखाने उसाला भाव देण्याच्या तयारीत असताना प्रकाश सोळुंके यांच्याकडून इतर कारखानदारांना दबावाच्या भाषा करून इतर कारखानदार भाव जास्त देत असताना त्यांना न देण्यासाठी इतर तंत्राचा वापर करून प्रकाश सोळुंके शेतकऱ्यांना गचंडीला धरत आहेत असे देखील वाकसे यांनी म्हटले आहे

बीड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची हेळसांड बीड जिल्ह्यातील गडगंज आणि टोलेदार बंगले बांधून त्यामध्ये वास्तवात असलेले कारखानदार यांनी मात्र शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा धंदाच चालू केला आहे की काय? असा प्रश्न ऊस उत्पादक शेतकऱ्याला पडताना दिसत आहे एफआरपी नुसार भाव न देता कारखानदारांनी स्वतःचा मनमानी कारभार शेतकऱ्यांच्या उसाची रिकवरी कमी दाखवून चालवलेला आहे परंतु बीड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखानदाराची मस्ती उतरवायची असेल तर जो कारखानदार शेतकऱ्यांच्या उसाला योग्य भाव देईल त्याच कारखान्याच्या गव्हाणीला आपल्या उसाची मोळी द्या अन्यथा जो भाव देणार नाही त्याची मस्ती उतरवा असे प्रखर मत प्रसिद्धी पत्रकाद्वारे करत मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे दिले आहे

पुढे ते म्हणाले की केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या ऊसाला एफआरपी नुसार भाव देण्याची तरतूद करूनही कारखानदार हे स्वतःच्या टोलेजंग बंगल्यातून निर्णय घेऊन शेतकऱ्याच्या मड्यावरचे लोणी खाण्याचे पाप करत आहेत स्वतःच्या मनमानीने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उसाचे भाव ठरवताना दिसत आहेत परंतु शेतकऱ्यांनी याचाही आता गांभीरपूर्वक विचार केला पाहिजे अन्यथा आगामी काळात शेतकऱ्याला जगणं मुश्किल होईल अशी परिस्थिती दिसत आहे सध्या बीड जिल्ह्यातील माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळुंके यांनी शेतकऱ्याची मोठ्या प्रमाणात चेष्टा लावलेले आहे शेतकऱ्याच्या उसाचा भाव स्वतःच्या



कारखान्याच्या माध्यमातून कमी देऊन इतर कारखानदारांना दमदाटी करायची आणि शेतकऱ्याचा ऊस कवडीमोल भावाने स्वतःच्या

# पुण्यातील फुरसुंगी, गंगानगर,भेकराईनगर, तुकाई दर्शन आदी भागात बिबट्या चा कळपाच्या रूपात वावर

## नागरिकांने सुरक्षित राहावे काळजी घ्यावी -श्याम पिंपळे




प्रतिनिधी @ पुणे

फुरसुंगी, गंगानगर,तुकाई दर्शन,भैकरानगर, आदर्श नगर, आदी भागात बिबट्या चा कळपाच्या रूपात वावर मागील काही दिवसांपासून सुरू झाल असुन यामुळे नागरिकांन मध्ये भिती चे वातावरण निर्माण होऊन रात्री ची झोप उडाली आहे..सदरील भागात लाखों लोकांच्या वसाहती,घरे असुन या भागात मोठ्या प्रमाणात शाळा असून यात हजारो लहान मुलांना शिक्षणाकरिता ये जा करावी लागती.तर याच भागात एस पी इन्फो सिटी नावाचा ऐंशी एकर चा आयटी पार्क असल्याने हजार नौकरदर चोवीस तास रस्त्यावरून वावरत असतात..

बिबट्या मुळे आता पर्यंत कोणत्याही नागरिकाला इजा झाली नाही पण नागरिकांन मध्ये भिती चे वातावरण निर्माण झाले आहे कारण बिबट्या हे एक दोन नसुन पाच ते सहा आहेत..जसे रात्री चया वेळी गल्ली बोळात कुत्रे फिरतात त्या प्रमाणे बिबटे कळपाच्या रूपात वावरत असुन कसलाही घातपात होण्याआधी पुणे प्रशासन आणि वन विभागाने वेळीत लक्ष देऊन बिबट्या ना जेरबंद करावे अशी मागणी या भागातील नागरिकांना केली असून नागरिकांनी सुरक्षित बाहेर पडावे आणि काळजी घ्यावीअसे आवाहन सोशल फायटर श्याम पिंपळे यांनी केले आहे..

# मच्छिंद्रनाथ चिंचोलीत आशा वर्कर घोटाळा ? निवड रद्द न केल्याने उमा वाघ यांचे कुटुंबासह आमरण उपोषण सुरू

## तालुका आरोग्य अधिकाऱ्यांची टाळाटाळ




घनसावंगी /प्रतिनिधी

मौजे मच्छिंद्रनाथ चिंचोली येथील आशा वर्कर निवड प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करत अर्जदार सौ.उमा रामेश्वर वाघ यांनी कुटुंबासह दि. १७ नोव्हेंबर २०२५ पासून तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.

निवड रद्द करण्याबाबत वारंवार तक्रारी, पुरावे व पाठपुरावा करूनही अधिकारी टाळाटाळ करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.बनावट कागदपत्रांचा आधार ? पिंपरखेड बु.च्या रहिवाशीस मच्छिंद्रनाथ चिंचोलीत नियुक्ती

उमा वाघ यांनी केलेल्या गंभीर आरोपांनुसार सद्याची आशा वर्कर आशा गौतम पटेकर या मच्छिंद्रनाथ चिंचोलीच्या रहिवासी नसून पिंपरखेड बु. येथील राहणाऱ्या आहेत.

तिचे आधार कार्ड,राशन कार्ड, मतदारयादीतील नोंद ही सर्व कागदपत्रे पिंपरखेड बु.येथील असल्याचे स्पष्ट झाले असून तरीसुद्धा बनावट कागदपत्रांचा आधार घेऊन तिने मच्छिंद्रनाथ चिंचोली येथील आशा वर्कर पद मिळवले असा वाघ यांचा आरोप.यामुळे गावातील नागरिक आणि प्रशासनाची फसवणूक झाली असेही त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामपंचायतीकडूनही निवडीवर प्रश्नचिन्ह ग्रामपंचायत मच्छिंद्रनाथ चिंचोलीचे सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांनी आशा गौतम पटेकर या गावच्या रहिवासी नाहीत परितक्ता नाहीत

हे सर्व पुरावे आरोग्य विभाग व जिल्हा परिषदेला सादर केले आहेत.तरीदेखील त्या निवडीवर कोणतीही कारवाई न करण्यामागे संशयास्पद भूमिका असल्याचे उपोषणकर्त्यांचे म्हणणे आहे.उमा वाघ पुरस्कारप्राप्त कार्यकर्ती तरीही अन्याय ? उमा वाघ या गावात सातत्याने केलेल्या चांगल्या कार्याबद्दल महिला व बालविकास विभागामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्राप्त लाभार्थी आहेत.

पात्र असूनही, पुरावे देऊनही सतत पाठपुरावा करूनही न्याय न मिळणे हे प्रशासनाचे अपयश आहे असे त्यांनी सांगितले.

लिखित तक्रारींनंतरही कारवाई शून्य उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला अर्जदारांनी आरोग्य अधिकाऱ्यांना दि.१३ नोव्हेंबरपर्यंत निवड रद्द करण्याची मागणी केली होती.

परंतु कोणतीही चौकशी नाही

कोणतीही कारवाई नाही निवड रद्द नाही त्यामुळे अखेर उमा वाघ व कुटुंबियांना १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ पासून आमरण उपोषण सुरू करावे लागले.

अधिकाऱ्यांचा टाळाटाळीचा खेळही उघडकीस ? या प्रकरणाबाबत पत्रकारांनी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अविनाश गायकवाड यांच्याशी संपर्क साधला असता

मी मीटिंगमध्ये आहे.नंतर बोलतो

अशी उडवाउडवीची प्रतिक्रिया मिळाली.पत्रकार व नागरिकांच्या म्हणण्यानुसार हीच टाळाटाळ आणि वेळ मारून नेण्याची भूमिका संशय अधिक गडद करते.गावकऱ्यांचा संताप उफाळला गावकरी आणि उपोषणकर्त्यांचे म्हणणे स्पष्ट

बोगस नियुक्ती रद्द करा पात्र उमेदवाराला न्याय द्या

प्रशासनाने या गंभीर प्रकरणाकडे तात्काळ लक्ष देत चौकशी करून कारवाई करावी अशी जोरदार मागणी होत आहे.

# अमरसिंह पंडित आणि त्यांच्या कुटुंबीयांना गेवराईकरांनी कधीच स्वीकारले नाही -- बदामराव पंडित



## सौ गीताताई पवार यांना विजयी करण्याचे आवाहन

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराईकरांनी गेल्या ३० वर्षापासून बीडच्या अमरसिंह पंडित आणि त्यांच्या कुटुंबीयांना कधी स्वीकारले नाही त्यांना गेवराई नगर परिषदेपासून नेहमीच लांब ठेवले आहे. पंधरा वर्ष माझ्याकडे तर पंधरा वर्षे लक्ष्मणराव पवारांकडे नगरपालिकेचा कारभार देवून गेवराईकरांनी शहराच्या विकासात भर घालण्याची संधी आम्हाला दिली. याच काळात मोठ्या प्रमाणावर विकास झाला. या विकासाची गती आणखी वाढवण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ गीताताई बाळराजे पवार यांच्यासह भाजपचे सर्व उमेदवार प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे गेवराई शहरात भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी प्रभागात जावून मतदारांच्या थेट गाठीभेटी घेत आहेत. यावेळी बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, गेवराई नगर परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी कडून नगराध्यक्ष पदासाठी गीता ताई त्रिंबक उर्फ बाळराजे पवार या उमेदवार असून सर्व प्रभागात भाजपने सामान्य लोकांसाठी काम करणारे शांत, संयमी आणि अभ्यासू असलेले उमेदवार दिले आहेत. या सर्व उमेदवारांच्या हाताला धरून गेवराईकर आपल्या प्रभागातील काम करून घेऊ शकतात. आता मी आणि बाळराजे पवार एकत्रितपणे या उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहोत. गेल्या ३० वर्षांमध्ये बीडच्या अमरसिंह पंडित आणि त्यांच्या कुटुंबीयांना गेवराईकरांनी शहरापासून कित्येक मैल दूर ठेवले आहे. येथील जनता त्यांना कधीच स्वीकारत नाही हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. पंधरा वर्ष माझ्या आणि पंधरा वर्ष लक्ष्मणराव पवार यांच्या ताब्यात गेवराईकरांनी नगरपालिका दिली होती. या कालावधीत शहरात सुरळीत शुद्ध पाणीपुरवठा, गल्लीबोळात रस्ते, नाल्या, लाईट याची सोय करण्यात आलेली आहे. विविध समाजाचे सुसज्ज समाज मंदिर उभे करण्यात आले आहेत. त्यासोबतच शहरात राहणाऱ्या गोरगरिबांना घरकुले, महिला बचत गटांना आर्थिक बळकटीसाठी निधी हा सातत्याने देण्यात आलेला आहे. बीड जिल्ह्यात एकही शहर गेवराई सारखे विकसित नाही. आता राज्यात आणि केंद्रात भाजपचे सरकार आहे तर बीड जिल्ह्याच्या नेत्या पंकजाताई मुंडे या मंत्री आहेत. त्यामुळे या विकासाची गती अधिक वाढवण्यासाठी आपल्या भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ गीताताई पवार यांच्यासह भाजपच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन करून बदामराव पंडित यांनी कोणतीही अडचण आल्यास मला आवाज द्या, मी अर्ध्या रात्री तुमच्या मदतीसाठी रस्त्यावर असेल अशी ग्वाही मतदारांना दिली आहे.

# हंस फाउंडेशनचा शिक्षणप्रेरणा उपक्रम घुंगर्डे हादगाव परिसरातील शंभराहून अधिक लहानग्यांना पाटी-खडूचे वाटप



अंबड /प्रतिनिधी

ग्रामीण बालकांच्या शिक्षणप्रवासाला बळ देण्यासाठी हंस फाउंडेशनतर्फे एक अभिनव आणि हृदयाला भिडणारा उपक्रम आज घुंगर्डे हादगाव परिसरात उत्साहात राबवण्यात आला. परिसरातील दहा पेक्षा जास्त अंगणवाड्यांमधील शंभराहून अधिक लहान मुलांना पाटी आणि खडू बॉक्स वाटप करून फाउंडेशनने शिक्षणाची पहिली पायरी अधिक सशक्त करण्याचा प्रयत्न केला. उद्देश केवळ वाटप नव्हे शिक्षणाची गोडी वाढवणे या उपक्रमाचा मुख्य हेतू ग्रामीण मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे लहान वयातच त्यांना शैक्षणिक साधनांची ओळख करून देणे शिकण्याची गोडी आणि प्रेरणा जागवणे

हंस फाउंडेशन अनेक वर्षांपासून ग्रामीण व आदिवासी भागात आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पोषण आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांत विविध सेवा उपक्रम राबवत आहे. या सातत्यपूर्ण कार्याचा एक भाग म्हणून आजचा शिक्षणप्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला. अंगणवाडी सेविकांचे कौतुक अंगणवाडी सेविकांनी फाउंडेशनच्या या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत करत सांगितले अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये शिकण्याची प्रेरणा वाढते पालकांनाही शिक्षणाचे महत्त्व समजते. गावाच्या शैक्षणिक वातावरणाला ही मोठी चालना आहे.कार्यक्रमाला उत्स्फूर्त उपस्थिती या वाटप कार्यक्रमाला हंस फाउंडेशनचे प्रतिनिधी

माऊली दोबोले, योगेश हेंद्रे, शिवाजी बामणे, आत्माराम नाटकर, ज्ञानेश्वर नांद्रे,जालिंदर चोरमले तसेच अंगणवाडी सेविका अनुपमा थोरात, शितल परिहार,मनीषा पवार, कविता वरकड, स्मिता राठोड, मदतनीस सावित्रा चोरमले, नंदा तळतकर, सागर खोडवे, रेखा मस्के आदी मान्यवर उपस्थित होते.

# लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणमार्फत बाल दिनानिमित्त

## यशवंत विद्यालय येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




लातूर /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या समान कार्यक्रमानुसार लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर जिल्हा न्यायालय व कलापंढरी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंत विद्यालय येथे शुक्रवारी बाल दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी बाल दिन का साजरा केला जातो, कायद्यानुसार बालकाची व्याख्या काय, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणच्या २०२४ मधील योजनेनुसार मुलांसाठी अनुकूल विधी सेवा योजनेबाबत, तसेच बालकांचे कायदेशीर हक्क व अधिकार याबाबत मुलांना मार्गदर्शन केले.

यावेळी यशवंत विद्यालयातील मुख्याध्यापिका डॉ. सुवर्णा जाधव, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. माधवराव गादेकर, कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी.पी. सूर्यवंशी, वकील सुनैना बायस व विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. बाल दिनानिमित्त यशवंत विद्यालयात चित्रकला, रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

बालकांच्या संरक्षण, अधिकार व हक्कासाठी असलेले किशोर न्याय (काळजी व संरक्षण) कायदा २०१५, लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२, बालविवाह प्रतिबंध कायदा २००६, बाल मजुरी प्रतिबंध कायदा १९८६ व बाल हक्क संरक्षण आयोग कायदा २००५ या कायद्यांबाबत श्री. गिरवलकर यांनी यावेळी माहिती दिली.

# अंबड नगर परिषद निवडणूक २०२५ छाननी प्रक्रियेला मोठा प्रतिसाद

## १२ नगराध्यक्ष तर ११६ नगरसेवक उमेदवार वैध २५ नोव्हेंबरपर्यंत अपील २६ ला चिन्हवाटप




अंबड/प्रतिनिधी :- अंबड नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या छाननी प्रक्रियेला आज दि.१८ नोव्हेंबर रोजी मोठ्या उत्सुकतेत आणि पारदर्शक वातावरणात तहसील कार्यालयात सुरुवात झाली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार आजच्या छाननीअंती थेट नगराध्यक्ष पदासाठी १२ उमेदवार आणि नगरसेवक पदासाठी तब्बल ११६ उमेदवार वैध ठरले आहेत.

सकाळी ११ वाजता निवडणूक निरीक्षक विजय राऊत, उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मनोज उर्किडे यांच्या उपस्थितीत प्रक्रिया सुरू झाली. दरम्यान जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनीही छाननी कक्षाला भेट देत संपूर्ण प्रक्रियेची पाहणी केली.वैध अवैध उमेदवारीचे चित्र नगराध्यक्ष पद १२ उमेदवार वैद्य प्रभाग १ ते ११ : ११६ नगरसेवक उमेदवार वैध ३ उमेदवार अवैध त्रेी - इ मूळ स्वरूपात/वेळेत न सादर केल्याने प्रभाग ८-अ, ९-ब आणि १०-अ मधील प्रत्येकी एक आगामी निवडणूक कार्यक्रम जाहीर उमेदवारी मागे घेणे १९ ते २१ नोव्हेंबर २०२५

दुपारी ३ वाजेपर्यंत वैध उमेदवारांना या कालावधीत आपली उमेदवारी मागे घेण्याची संधी.अपील कालावधी २५ नोव्हेंबर २०२५ मंगळवार पर्यंत छाननीतील निर्णयाविरोधात इच्छुकांना अपील दाखल करण्याची मुदत. चिन्ह वाटप २६ नोव्हेंबर २०२५ बुधवार अपील प्रक्रिया संपल्यानंतर अंतिम रिंगणातील उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप.महत्त्वाची सुचना सर्व वैध ठरलेल्या उमेदवारांनी-मतपत्रिकेसाठी दोन रंगीत पासपोर्ट फोटो निवडणूक खर्च नोंदवही संदर्भातील कागदपत्रे

लवकरात लवकर तहसील कार्यालयातील निवडणूक शाखेत जमा करावीत.निवडणूक निर्णय अधिकारी श्री.विजय चव्हाण यांचे आवाहन सर्व उमेदवार आणि राजकीय पक्षांनी वेळापत्रकाची काटेकोरपणे नोंद ठेवावी आणि नियमानुसार कार्यवाही करावी.

# अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या महाराष्ट्र संघटकपदी विकासकुमार बागडी



डॉ आशिष तिवारी/जालना -

पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणारी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघच्या महाराष्ट्र संघटकपदी जालना येथील जालना समाचारचे संपादक विकासकुमार बागडी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यांची ही नियुक्ती अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने यांच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा राष्ट्रीय संघटक कैलास देशमुख यांनी एका नियुक्तीपत्रकाव्दारे केली आहे.

विकासकुमार बागडी हे मागील २८ वर्षापासून पत्रकारीता क्षेत्रात आहे. ते पत्रकारांचे विविध प्रश्न व हितासाठी काम करीत असून, त्यांच्या या कार्याची दखल घेवून त्यांना महाराष्ट्र संघटकपदाची जवाबदारी देण्यात आली आहे. आगामी काळात पत्रकारांची एकजुट करण्यासह त्यांच्या हितासाठी काम करणार असल्याची ग्वाही नुतन महाराष्ट्र संघटक विकासकुमार बागडी यांनी दिली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष युसूफखान पठाण, केंद्रीय नियोजन समिती अध्यक्ष सुरेश सवळे, राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, राष्ट्रीय महासचिव अशोक पवार, महाराष्ट्र प्रदेश महिला मंच सरचिटणीस कांचनताई मुरके , तसेच जिल्ह्याचे जेष्ठ पत्रकार, संपादक, जिल्हा प्रतिनिधी, उद्योजक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ता आदिंनी अभिनंदन केले आहे.

# हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून

मुंबई : राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून नागपुरात होणार आहे. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सोमवारी एका अधिसूचनेद्वारे ही घोषणा केली. या अधिवेशनात राज्यातील कळीचे कायदे, जनहिताचे प्रश्न व विभागीय विकास आदी मुद्यांवर सखोल चर्चा होण्याची शक्यता आहे.

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा फड रंगला आहे. राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींसाठी येत्या २ डिसेंबर रोजी निवडणूक होणार आहे. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे. त्यानंतर जिल्हा परिषदा व महापालिकांचीही निवडणूक होणार आहे. त्याची घोषणा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. या घटनाक्रमामुळे राज्य विधिमंडळाचे नागपुरात होणारे हिवाळी अधिवेशन लांबणीवर पडेल असा अंदाज व्यक्त केला जात होता. पण राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सोमवारी एका अधिसूचनेद्वारे हे अधिवेशन ८ डिसेंबरपासूनच सुरू होणार असल्याचे स्पष्ट केले.




## सरकार व विरोधक भीडणार

या अधिसूचनेत विधानसभा व विधानपरिषदेचे कामकाज ८ डिसेंबर रोजी अनुक्रमे सकाळी ११ वा. व दुपारी १२ वा. सुरु होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यात हे अधिवेशन किती दिवसांचे असेल म्हणजे ते केव्हा संपुष्टात येईल याचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे हे अधिवेशन सरकार एक किंवा दोन आठवड्यांत आटोपते घेईल असे मानले जात आहे. या अधिवेशनात महागाई, शेतक-यांचे प्रश्न, वीज दरवाढ, बेरोजगारी, कथित मतचोरी, कळीचे कायदे आदी मुद्यांवरून सरकार व विरोधकांत जोरदार खडाजंगी होण्याची शक्यता आहे.

# जालना शहरात आरटीओ वाहतूक पोलिसांची धडाकेबाज संयुक्त मोहीम

## ४८ वाहनांवर कारवाई तब्बल रु.३,१५,७५० दंड वसुल

फारुक शेख :- जालना शहरात वाहतूक शिस्त आणि कायद्याची अंमलबजावणी अधिक कडक करण्यासाठी आज दि.१८ नोव्हेंबर २०२५ रोजी आरटीओ विभाग आणि शहर वाहतूक पोलिसांनी संयुक्त विशेष मोहीम राबवून ४८ वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. ई-चलनाद्वारे वसूल दंड रु.३,१५,७५० वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या वाहनचालकांना पोलिसांनी आज अक्षरशः चपराक दिली आहे.कडक मोहिमेची अंमलबजावणी शहरभर खळबळ जालना उपप्रादेशिक परिवहन विभाग ठढज आणि शहर वाहतूक शाखेच्या पथकांनी शहरातील विविध चौक, मुख्य रस्ते आणि गर्दीच्या भागांमध्ये सकाळपासून कारवाई सुरू केली.यामध्ये विना परमिट प्रवासी वाहतूक करणारे रिक्षा चालक विना नंबरची वाहने बेकायदेशीर बस सेवा



इतर वाहतूक नियम तोडणारे वाहनचालक अशा उल्लंघन करणाऱ्यांवर थेट ऑनस्पॉट ई-चलनाद्वारे दंड वसूल करण्यात आला.वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम ही कारवाई पुढील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल,अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी ,उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी मोहीमेचे नेतृत्व शहर वाहतूक पोलीस निरीक्षक पी.व्ही.इंगळे यांनी केले.याचबरोबर शहर वाहतूक शाखा,पोलीस ठाणे कदीम जालना,सदर बाजार, जिल्हा वाहतूक शाखा कदमाबाद आणि ठढज चे अधिकारी व कर्मचारी यांचे मोठे सहकार्य लाभले.४८ वाहनांची तपासणी ; नियम मोडणाऱ्यांचा चक्काजाम मोहीमेदरम्यान एकूण ४८ रिक्षांची कसून तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन सिद्ध झाल्यानंतर संबंधितांवर त्वरित दंडात्मक कारवाई करून ई-चलन तयार करण्यात आले. पुढेही अशा मोहिमा चालूच वाहतूक पोलिसांचा इशारा शहर वाहतूक पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांसाठी जालना शहरात कोणतीही सूट नाही.अशा मोहिमा सातत्याने राबवल्या जातील.नागरिकांनी नियमांचे पालन करून वाहतूक शिस्त राखावी आणि अपघातमुक्त शहरासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांना ८ वा वेतन आयोग लागू केला तसा

# शेतकऱ्यांना स्वामीनाथन आयोग लागू करावा - वसुदेव बप्पा गायकवाड

केज/प्रतिनिधी

केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचा-यांना ८ वा वेतन आयोग लागू केला आहे. त्याप्रमाणे देशातील सर्व शेतकर्यांसाठी २००६ पासून प्रलंबित असलेला स्वामीनाथन आयोग लागू करावा अशी मागणी आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज जि.बीडचे संस्थापक कार्यवाह तथा जेष्ठ समाजसेवक डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केंद्र शासनाकडे केली आहे.केंद्रीय कर्मचाऱ्यांना रोज १५०० रुपये मिळत असताना देशातील शेतकर्यांनाही १०००, १२०० रुपये रोज मिळावेत अशी मागणी डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केली आहे.एमएसपीसी नुसार शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव,बाजारभाव मिळणे आवश्यक आहे.

बि -बियाणे,खते, किटकनाशके यांच्या वाढलेल्या किंमती पहाता आणि शेतकर्यानेपोटच्या लेकराप्रमाणे पोसलेल्या, जोपासलेल्या पिकांच्या किंमत मात्र वाढत नाहीत. शेतकर्यांच्या शेतीच्या मशागतीचा खर्च वाढतोय पण उत्पन्न वाढत नाही म्हणून देशाचा पोशिंदा असलेला बळीराजा शेतकरी कर्जबाजारी होतोय.आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलतोय याची किमान जाणीव ठेवून तरी केंद्र शासनाने स्वामीनाथन आयोग लागू करून शेतीमालाला हमी भाव द्यावा अशी मागणी डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केली आहे.केंद्रीय कर्मचारीही माणूसच आहे आणि शेतकरीही माणूसच आहे मग हा भेदभाव का?असा प्रश्न आहे.केंद्र शासनाने शेतकर्यांच्या लेकरांनाही शिक्षण घेता यावे,उच्च शिक्षित होता यावे, शेतकऱ्यांच्या लेकरांची लग्न व्हावीत,त्यांचाही सुखाचा संसार व्हावा म्हणून तरी २००६ पासून प्रलंबित असलेला स्वामीनाथन आयोग



शेतकर्यांसाठी लागू करावा व शेतमालाला हमीभाव बाजारभाव मिळावा अशी मागणी आनंद ग्रामिण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज जि.बीडचे संस्थापक कार्यवाह,जेष्ठ समाज सेवक डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केंद्र शासनाकडे केली आहे.

# लोकविकास महाआघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांच्या उमेदवारी अर्जावरील आक्षेप फेटाळला

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

लोकविकास महा आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर कांताप्रसाद मोदी यांच्या उमेदवारी अर्जावर विरोधी उमेदवार नंदकिशोर मुंदडा यांनी घेतलेल्या आक्षेपाचे खंडन करून तो आक्षेप निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी फेटाळला . मंगळवार दि १८ रोजी नामनिर्देशन अर्जाच्या पडताळणी मध्ये कोणताही दोष किंवा त्रुटी आढळुन न आल्याने राजकिशोर मोदी यांचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवारी अर्ज वैध ठरला गेला.

नगर परिषद निवडणुका जाहीर झाल्या पासूनच लोकविकास महा आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांना कोंडीत पकडण्यासाठी वारंवार साम, दाम, दंड ,भेद असे सर्व प्रकार विरोधकांनी वापरून रडीचा डाव सुरू केला आहे.राजकिशोर मोदी यांच्या सहकार्यांना विविध आमिषे , दडपशाही ,धमक्या देऊन त्यांचे भारतीय जनता पक्षात पक्ष प्रवेश घडवून आणले. तरी सुद्धा जनतेच्या मनातील राजकिशोर मोदी यांच्या बद्दलची आपुलकीची भावना कमी होत नसल्याने विरोधक बिथरून गेल्याचे दिसून येत आहेत. एवढे करूनही राजकिशोर मोदी हे कुठेच व कशातच कात्रीत सापडत नसल्याचे लक्षात येताच त्यांना आता कागदपत्रांत कोठे गाठता येते का? आणि काहीपण करून मोदी यांना निवडणुकीतून बेदखल करता येते का? यासाठीचे प्रयत्न भारतीय जनता पक्ष तथा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार नंदकिशोर मुंदडा यांच्याकडून केल्या जात आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर मंगळवार दि १८ रोजी अर्ज पडताळणीची प्रक्रिया पार पडली.यामध्ये राजकिशोर मोदी यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जात क्रमांक पाचच्या रकान्यात जातीचा उल्लेख केल्याचा किरकोळ व तोंडी आक्षेप प्रतिस्पर्धी उमेदवार नंदकिशोर मुंदडा यांनी घेतला. पण अंबाजोगाई नगर परिषदेचे नगराध्यक्ष पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी असल्याने दाखल केलेल्या अर्जात जातीचा उल्लेख केला किंवा नाही केला तरी फरक पडत नाही असे निवडणुक निर्णय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी दीपक वजाळे यांनी स्पष्ट करत मुंदडा यांनी घेतलेला आक्षेप साफ फेटाळून लावला. याउपर सुद्धा आक्षेप घ्यायचा असेलच तर लेखी स्वरूपात आपला आक्षेप घ्यावा असे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितले. पण आक्षेप घेण्याची मुदत संपेपर्यंत विरोधकांकडून कसलाच लेखी आक्षेप आला नाही. याबाबत आमच्या प्रतिनिधींशी बोलताना राजकिशोर मोदी यांनी विरोधकांनी रडीचा डाव न खेळता नैतिक मार्गांचा अवलंब करून निवडणूक लढवावी असे आवाहन त्यांनी केले. आजपर्यंत त्यांनी माझ्यावर अनेक बिनबुडाचे आरोप केले, पण एकसुद्धा आरोप ते सिद्ध करू शकले नसल्याचे मोदी यांनी सांगितले. विरोधकांच्या दडपशाहीला , आर्थिक आमिषाला आणि खोटच्या प्रचाराला अंबाजोगाई ची सुजाण जनता बळी पडणार नाही हे निकालातुनच दिसून येईल असा ठाम विश्वास देखील राजकिशोर मोदी यांनी यावेळी बोलून दाखवला.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेची ई- केवायसी करण्यास ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ - श्री.बाजीराव ढाकणे

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील हजारो लाडक्या बहिणीची ई -केवायसी करणे बाकी होते या संदर्भात महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस,उप मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे,उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार आणि महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना संपूर्ण राज्यात अतिशय यशस्वीरित्या राबवली जात आहे.पण या योजनेबाबत दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ पूर्वी सर्व लाभार्थ्यांनी ई - केवायसी प्रक्रिया करावी अशा सूचना राज्य सरकारच्या वतीने यापूर्वी देण्यात आल्या होत्या.या संदर्भात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे यांच्याशी वेळोवेळी पाठपुरावा करत या योजनेची ई- केवायसी करण्यास मुदतवाढ देण्याची मागणी महाएनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक तथा लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांनी केले होती.कारण महाराष्ट्र राज्यात गेल्या काही दिवसांत आलेल्या नैसर्गिक आपत्ती आणि इतर अडचणींमुळे, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण 'योजनेतील अनेक पात्र भगिनींना इ - केवायसी प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आली नाही, याचीकल्पना संबंधितांच्या लक्षात आणून दिली असता त्यांनी तातडीने उचित ठरेल अशी कारवाई करत मुदतवाढ दिली आहे.या अडचणींची गांभीर्याने नोंद घेत राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.याबद्दल महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक तथा लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांनी राज्य सरकारचे आभार मानले आहेत.लाडकी बहीण योजनेची ई-केवायसी करण्याची अंतिम मुदत आता ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच ज्या पात्र लाभार्थी महिलांचे वडील किंवा पती हयात नाहीत किंवा घटस्फोट झालेला आहे. त्या लाभार्थी महिलांनी स्वतःचीच ई- केवायसी करावी व त्यांचे पती अथवा वडील यांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र किंवा घटस्फोट प्रमाणपत्र किंवा मा.न्यायालयाचे आदेश याची सत्यप्रत संबंधित जिल्ह्यातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कडे जमा करावे.असे राज्य सरकारने जाहीर केले आहे.या निर्णयामुळे योजनेच्या लाभाची सातत्यता आणि अखंडितता



कायम राहणार आहे.ज्या भगिनींनी अद्याप इ - केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही,त्यांना विनंती आहे की,त्यांनी या विस्तारित मुदतीचा लाभ घेत ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी असे आवाहन लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांनी केले आहे.

# ५०% आरक्षण मर्यादेवरुन सुप्रीम कोर्टाने सरकारला फटकारले; २ डिसेंबरच्या निवडणुकांवर सावट

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत आरक्षणाची मर्यादा ओलांडू नका, नाहीतर निवडणुकाच रोखू, असा गंभीर इशारा सुप्रीम कोर्टाने दिला आहे. आरक्षण मर्यादा ओलांडली जात असल्याच्या याचिकेवर सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने संताप व्यक्त केला. या याचिकेवर बुधवारी पुन्हा सुनावणी होणार असल्याने राज्यातील पालिका निवडणुकांवर टांगती तलवार आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत ओबीसी प्रवर्गासाठी सरसकट २७ टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्यामुळे अनेक पालिकांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली जात असल्याकडे सुप्रीम कोर्टाचं याचिकेद्वारे लक्ष वेधण्यात आलं. ओबीसी आरक्षणाबाबत विकास गवळी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमला बागची यांच्या खंडपीठापुढे काल सुनावणी झाली. तेव्हा आपल्या आदेशाचा चुकीचा आणि सोयीचा अर्थ काढून ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण लागू करण्याच्या



राज्य सरकारच्या कृतीवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र संताप व्यक्त केला.

सर्वोच्च न्यायालयात काय काय घडलं?

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशप्रमाणे बांठिया आयोगाच्या पूर्वीच्या परिस्थितीत म्हणजेच ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणूक व्हायला पाहिजे आणि ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली जाते आहे, असा दावा करणाऱ्या राज्य सरकारविरोधातील अवमान याचिकेवर काल (१७ नोव्हेंबर) सुनावणी झाली.

तुषार मेहता (सरकारी वकील)- निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे.

तुषार मेहता- निवडणूक आयोगाला अधिकचा कालावधी वाढवून मिळणार नाही , असं न्यायालय म्हणलं होतं.

न्यायाधीश सूर्यकांत- आम्ही असं म्हटलं की बांठिया आयोगाची आम्ही नंतर तपासू पण त्यावेळी जी परिस्थिती त्यानुसार निवडणूक होईल.

(बांठिया अयोगापूर्वी जो कायदा अस्तित्वात होता , असा शब्द सर्वोच्च न्यायालयाचा आदेशात आहे )

न्यायमूर्ती सूर्यकांत- ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडू नका. नाहीतर निवडणुकाच रोखू...न्यायमूर्ती सूर्यकांत- बांठिया आयोगाची वैधता आपण नंतर तपासू...

न्यायमूर्ती जॉयमला बागची- पन्नास टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली जाणार नाही, हा घटनापीठाचा आदेश आहे.


तुषार मेहता- आम्हाला अजून थोडा वेळ मिळावा, तोपर्यंत आम्हाला माहिती घेऊ दे...

न्यायमूर्ती सूर्यकांत- आमचा आदेश खूप सरळ साधा होता तुमच्या अधिकाऱ्यांनी गोंधळ केला आहे.

### २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठी येत्या २ डिसेंबरला मतदान

मिनी विधानसभा निवडणूक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत काल संपली. आजपासून अर्जांची छाननी होणार आहे. अर्ज छाननी नंतर वैध उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार असून १९ ते २१ नोव्हेंबर या दरम्यान उमेदवारांना अर्ज मागे घेता येतील. तर २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची चिन्हांसह अंतिम यादी जाहीर करण्यात येणार आहे. राज्यातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठी येत्या २ डिसेंबरला मतदान होणार आहे तर ३ डिसेंबरला निकाल लागणार आहे.

# हुडहुडी:संभाजीनगरात तापमान १२.४ अंश



धुळ्यात पारा ६.२ अंशावर, राज्यात नीचांकी

जळगाव /प्रतिनिधी

मध्य प्रदेशासह पाच राज्यांमध्ये निर्माण झालेला हवेचा दाब आणि ताशी ३० किमी वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे राज्यात २१ नोव्हेंबरपर्यंत शीतलहर येणार आहे. खान्देशसह उत्तर महाराष्ट्रात याचा सर्वाधिक प्रभाव जाणवणार असल्याने धुळ्यात सोमवारी (१७ नोव्हेंबर) सर्वाधिक कमी ६.२ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. धुळे शहरात गेल्या ४ वर्षांतील नोव्हेंबरातील हा नीचांक आहे. तर छत्रपती संभाजीनगरमध्ये पारा १२.४ अंशावर होता. जळगाव, नाशिक शहर, मालेगाव, अहिल्यानगर, जेऊर (जि. सोलापूर), यवतमाळ, बीडसह ७ ठिकाणी पारा १० अंश किंवा त्याखाली नोंदवण्यात आला.

सोमवारी यवतमाळ व जेऊरला पहाटे पाच वाजता अनुक्रमे ९.६ व ८ अंश सेल्सियस इतके किमान तापमान नोंदवले असून ते सरासरीपेक्षा अनुक्रमे ७.४ व ६.५ अंशांनी घसरले. तर जळगाव, नाशिक, मालेगाव, गोंदियाला सोमवारी पहाटे पाच वाजता अनुक्रमे ९.८, ९.६, १० व १० अंश इतके किमान तापमान नोंदवले. ते तेथील सरासरीपेक्षा अनुक्रमे ५, ५, ५.१ व ५.८ अंशाने घसरले आहे. डहाणू, अहिल्यानगर, पुणे, सातारा, नांदेड, परभणी, अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा शहर व लगतच्या परिसरातही थंडीच्या लाटेसदृश्य स्थिती अनुभवली. वारा वहन पॅटर्नमध्ये होणाऱ्या बदलातून २२ नोव्हेंबरपासुन काहीशी थंडी कमी होण्याची शक्यता आहे. वेस्टर्न डिस्टर्बन्सची कमी सक्रियता आणि उत्तर-पश्चिमी थंड वाऱ्यांमुळे हा कडाक्याच्या थंडीचा ट्रेंड कायम राहणार असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

सरासरी ४.५ ते ५ अंश घसरण

# अवैध रेती उपसा करण्यासाठी कंटेनर मध्ये दोन बोटी घेऊन जाताना

## ग्रामीण पोलीसांनी छापा मारुन कारवाई ८५०००००० मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)

नांदेड :- दि १७ नोव्हेंबर रोजी रात्री ९ . ३० च्या दरम्यान चंदासिंघ कॉर्नर नांदेड येथे गोपनिय माहिती द्वारे नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन येथिल कर्मच्यारी चंदासिंघ कॉर्नर येथे गेले असता कंटेनर मध्ये गोदावरी नदी पात्रातील रेती उपसा करण्यासाठी दोन लोखंडी बोट व एक पांढऱ्या रंगाचा कंटेनर नांदेड ग्रामीण पोलीसांनी धाडसी कारवाई करून जप्त केला आहे . यात फिर्यादी शेख इब्राहीम शेख इस्माईल वय ५३ वर्ष व्यवसाय पोहेकॉ/ २२८२ नेमणुक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांच्या फिर्यादी वरुण दि १८ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला . पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक, भोकर सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड प्रशांत शिंदे, उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग इतवारा नांदेड आदिच्या मार्गदर्शना खाली गुन्हा उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोहेकॉ/ शेख इब्राहीम, पोहेकॉ/ भोसले, पोहेकॉ/ माने, पोकॉ/ मारवाडे सर्व नेमणुक पो.स्टे. नांदेड ग्रामीण आदिनी कारवाई करून अटक केलेला कंटेनर चालक १) विशाल बाळासो सोनमाळे वय २५वर्ष व्यवसाय चालक रा. नातेपुते ता. कालशिरस जि. सोलापूर जप्त मुद्देमाल / एकुण मुद्देमाल १) एक पांढ-या रंगाचा कंटेनर क्र चक५३ इ ०३०२ किमत ६०,००,०००/- २) एक मोठी लोखंडी बोट किंमत २०,०००/- रुपये, ३) एक मध्यम साईजची लोखंडी बोट किंमत ५,००,०००/- रू असा एकुण ८५,००,०००/- रुपयाचा मुद्देमाल थोडक्यात हकीकत अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतुक करणारे लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने ओमकांत चिंचोलकर पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली पोहेकॉ/२२८२ शेख इब्राहीम, पोहेकॉ/२१५८

भोसले, पोहेकों/१७३ माने,



चापोकों/७। मारवाडे सर्व नेमणुक पो.स्टे. नांदेड ग्रामीण असे पो.स्टे. हद्दीत पिटर मोबाईलने पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, चंदासिंग कार्नर रोडने एक चालक सुर्यास्तानंतर लपुन छपुन रेती चोरी करण्याच्या उद्देशाने दोन बोटी अवैधपणे नदीपात्रामध्ये नेऊन टाकण्यासाठी कंटेनर मध्ये वाहतुक करत आहे. सदर माहीती वरून दिनांक १५ नोव्हेंबर रोजीचे रात्री अंदाजे ९.३० वाजता चंदासिंग कॉर्नर या ठिकाणी जाऊन दबा धरूण बसुन मिळुन आलेले कंटेनर क्र चक५३ इ ०३०२ तपासले असता त्या मध्ये दोन लोखंडी बोटी मिळून आल्या. चालकास नाव गाव विचारले असता तो नाव गाव व्यवस्थित सांगत नसल्याने व संशयास्पद हालचाली करत असल्याने त्यास बोटीचे व गाडीचे कागदपत्र विचारले असता कोणतेही कागदपत्र नसल्याचे सांगीतले, त्यास बोट वाहतुक करण्याचा उद्देश विचारला असता तो उडवा उडवीचे उत्तरे देत होता. आणि संशयास्पद बोलत होता. त्यास विश्वासात घेवुन विचारले असता त्यांनी सांगीतले की सदरच्या बोटी या रेती चोरी करण्यासाठी येळी महाटी गोदावरी नदी घाटामध्ये सोडण्यासाठी घेऊन जात आहे. असे सांगुन त्याने त्याचे नाव गाव विशाल बाळासो सोनमाळे वय २५ वर्ष व्यवसाय चालक मालक रा. नातेपुते ता. काळशिरस जि. सोलापुर असे सांगीतले सदरच्या बोटी कोणाच्या आहेत विचारले असता त्याने त्याचे नाव सांगीतले नाही. सदर वेळी दोन पंचा समक्ष जप्ती पंचनामा करूण सदर कंटेनर व त्यातील दोन बोटी असा एकुन ८५,००,०००/-रू चा मुद्देमाल जप्त करूण यातील आरोपी विरूध्द कलम १२२, १२४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील नांदेड ग्रामीण पोलीस अधिकारी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व अंमलदार यांनी केलेल्या कामगीरीचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, पोलीस यांनी कौतुक केले आहे.




## राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते पत्रकार गंगाधर ढवळे यांना उत्कृष्ट पदाधिकारी पुरस्कार प्रदान

नायगाव (प्रतिनिधी)

नायगाव तालुका व्हॉइस ऑफ मीडियाचे नायगाव तालुका अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार गंगाधर ढवळे यांना छत्रपती संभाजी नगर विभागातून पंढरपूर येथील व्हॉइस ऑफ मीडियाच्या शिखर अधिवेशनात उत्कृष्ट पदाधिकारी पुरस्कार राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे.

व्हाईस ऑफ मीडिया या आंतरराष्ट्रीय पत्रकारांच्या संघटनेने राज्यातील पत्रकारितेला नवी दिशा देण्याची आज काळाची गरज आहे. जिथे माध्यम आहे, तिथे लोकशाही सक्षम होते असे उद्गार राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी पुरस्कार प्रदान करताना काढले. व्हाईस ऑफ मीडिया ïï इंटरनॅशनल फोरमचे महाराष्ट्र राज्य शिखर अधिवेशन पंढरपूर मध्ये अत्यंत उत्साहात पार पडले राज्यातून सुमारे २००० पत्रकारांच्या उपस्थितीने दोन दिवशीय अधिवेशनाला भव्य स्वरूप प्राप्त झाले. पत्रकार गंगाधर ढवळे यांच्या संघटनात्मक कार्याची दखल घेऊन व्हॉइस ऑफ मीडियाच्या महाराष्ट्र टीमने उत्कृष्ट पदाधिकारी पुरस्कारासाठी निवड केली. व्हॉइसऑफ मीडियाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संदीपभाई काळे यांच्या मार्गदर्शनात ढवळे हे व्हाईस ऑफ मीडियाचे तालुका अध्यक्ष म्हणून काम करत आहेत. गंगाधर ढवळे यांना उत्कृष्ट पदाधिकारी पुरस्कार मिळाल्याने जिल्हाध्यक्ष प्राचार्य गणेश जोशी, जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे, ऋषिकेश कोंडेकर, एस.एम.मुदखेडकर यांच्यासह व्हाईस ऑफ मीडियाचे सर्व पदाधिकारी यांच्यासह सर्व स्तरातून त्यांचे स्वागत होत आहे



## भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन

नांदेड (प्रतिनिधी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सामाजिक शास्त्रे संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष व्याख्यानाचे आयोजन शनिवार १५ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विज्ञान व तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील होते. प्रमुख वक्ते म्हणून आदिवासी साहित्य व संस्कृतीचे अभ्यासक डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास आणि भगवान बिरसा मुंडा या विषयावर सखोल आणि प्रेरणादायी मार्गदर्शन केले. डॉ. अनमुलवाड यांनी आपल्या व्याख्यानात आदिवासी समाजाचे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील मोलाचे योगदान अधोरेखित केले. ब्रिटिश राजवटीला दिलेले भगवान बिरसा मुंडा यांचे कठोर आव्हान, तसेच त्यांच्या प्रेरणेने राणी दुर्गावती, तीलका मांझी, शंकर शहा-रघुनाथ शहा, सिद्धो-कान्हो, तंट्या भिल्ल, उमाजी नाईक, राघोजी भांगरे, बाबुराव शेडमाके यांसारख्या आदिवासी शूरवीरांनी देशासाठी दिलेले योगदान त्यांनी विशद केले. भारतातील मूळनिवासी संस्कृती टिकवण्याचे आणि जपण्याचे कार्य आदिवासी समाजाने महत्त्वपूर्णरीत्या पार पाडले असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यापीठातील ललित कला आणि प्रयोगजीवी संकुलातील लखन कनाके आणि त्यांच्या सहकलावंत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आदिवासी नृत्यामुळे आदिवासी संस्कृतीचे आर्तदर्शन घडले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. मारुती गायकवाड, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. प्रमोद लोणारकर, संचालक, सामाजिक शास्त्रे संकुल यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, नवोपक्रम, संशोधन व साहचर्य विभागाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांची विशेष उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सामाजिक शास्त्रे संकुलातील डॉ. शिवाजी गायकवाड, डॉ. भाऊसाहेब आदमाने, डॉ. तातेराव पवळे, डॉ. नायर, डॉ. भोसीकर, डॉ. साळुंके, तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक विद्यार्थी आणि संशोधक विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

# हिमायतनगर नगरपरिषद निवडणूक : सध्यातरी युतीचे गुऱ्हाळ फिसकटले

### नगराध्यक्ष पदासाठी २१ तर नगरसेवकपदासाठी १८९ अर्ज; तरुणाईचा जोश, तहसील कार्यालयात मेळाव्याचे वातावरण!

हिमायतनगर (प्रतिनिधी)

दि १७ नोव्हेंबर रोजी नऊ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर येणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीत हिमायतनगरचे राजकारण अक्षरशः पेटले आहे. कडाक्याची थंडी असतानाही तहसील कार्यालयासमोर उमेदवार, कार्यकर्ते, समर्थक यांची जबरदस्त गर्दी झाली आणि वातावरण निवडणूक जत्रेचे रूप घेऊन तुफान गडबडजनक दृश्य निर्माण झाले. शेवटच्या दिवशी काँग्रेस चे माजी आमदार माधवराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष पदासह १७ प्रभागांतील उमेदवारांचे अर्ज एकाच वेळी दाखल करून शक्तीप्रदर्शन केले. त्यानंतर भाजप, शिंदेसेना, उबाठा, राष्ट्रवादी - अजित पवार गट, राष्ट्रवादी - शरद पवार गट, वंचित बहुजन आघाडी आदी पक्षांनी आपली उमेदवारी दाखल करताच साऱ्या परिसरात उत्साह, घोषणाबाजी, रांगा आणि वातावरणात ठिणग्या उडाल्या. **महाविकास आघाडी आणि महायुतीची युती कोसळली 'नगराध्यक्ष पद कोणाला?' या प्रश्नावरच सर्व काही अडकले** दोन्ही प्रमुख आघाड्यांमध्ये (महा.वि.आ. आणि महायुती) मागील काही दिवसांपासून जोरदार सुतोवाच सुरू होते. मात्र नगराध्यक्ष पदाचा तिढा सुटला नाही. प्रत्येक पक्षाने पहिला हक्क आमचा! अशी भूमिका घेतल्याने युतीची जहाजे तटापर्यंत पोहोचण्याआधीच धडाधड बुडाली. स्थानिक पातळीवरूनच समजते की अनेक पक्षांचे नेते- नगराध्यक्ष पद न सोडणे, प्रभागांचे अवाजवी वाटप, गटांतर्गत नाराजी, तरुणांचे बंड - या कारणांमुळे दोन्ही आघाड्यांचे सूत्र पूर्णपणे हातातून साध्यतरी सुटले. युती सध्यातरी फिसकटल्यामुळे सर्वच पक्ष स्वतंत्र लढत देणार याचे चित्र आहे. त्यामुळे येथील निवडणूक सरळ-द्विपक्षीय न राहता ते बहुरंगी होणार हे निश्चित. नगराध्यक्ष पदासाठी सहा प्रमुख चेहरे - २१ अर्जांची रांग नगराध्यक्ष पदासाठी सर्व प्रमुख पक्षांचे उमेदवार खालीलप्रमाणे आहेत: काँग्रेस: शेख रफिक शेख महेबूब भाजप: डॉ. राजेंद्र वानखेडे शिंदेसेना: रामभाऊ ठाकरे राष्ट्रवादी (अजित पवार गट): मो. जावेद अ. गणी राष्ट्रवादी (शरद पवार गट): सरदारखान खलीलखान पठाण उद्धव ठाकरे गट: चंद्रकला परमेश्वर गुड्डटवार याशिवाय काही स्वतंत्र इच्छुकांनीही अर्ज भरल्याने नगराध्यक्ष पदासाठी एकूण २१ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. ही बहुकोनी स्थितीत मतदानाचा कोन, जातीय-घटक समीकरणे आणि बुथनिहाय मतविभाजन अधिक गुंतागुंतीचे करणार आहे. नगरसेवक पदासाठी तब्बल १८९ उमेदवार - राजकीय रणधुमाळीला सुरुवात नगरसेवक पदासाठी १७ प्रभागांमधून एकूण १८९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. अनेक प्रभागांत ८ते १० उमेदवारांपर्यंत चुरस दिसत आहे. तरुणाईचा मोठा ओघ महिला उमेदवारांचा उत्साहजातीय व सामाजिक समिकरणांतील चढउतार स्थानिक मुद्द्यांवरील लोकाभिमुख अजेंडा या सर्व घटकांचा परिणाम या निवडणुकीवर मोठ्या प्रमाणात होणार आहे. अभी नहीं तो कभी नहीं - तरुणांचा जोश उसळला नऊ वर्षांनंतरची ही निवडणूक असल्याने तरुण उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात रिंगणात उडी घेतली आहे. तहसील कार्यालयात तरुण कार्यकर्त्यांची घोषणाबाजी, सोशल मीडिया लाइव्ह, फोटोग्राफी आणि उत्साहपूर्ण वातावरण विशेष ठरले. अनेकांनी 'दोहेरी' रणनीती - पक्ष व अपक्ष दोन्ही अर्ज भरून सुरक्षित खेळी केली. पक्षांतर्गत तिकीट मिळण्यात अनिश्चितता असल्याने मोठ्या संख्येने उमेदवारांनी अपक्ष + पक्ष असे दोन्ही अर्ज भरले आहेत.काहीजणांना पक्षाचे तिकीट न मिळाल्यास 'स्वतंत्र' म्हणून स्पर्धेत उतरायचे नियोजन आधीपासूनच करून ठेवले आहे. यामुळे प्रभागनिहाय मतविभाजन अधिक गुंतागुंतीचे होणार आहे. युतीचा गोंधळ 'फॉर्म रिटर्न'पर्यंत सुरू राहणार दि २१ नोव्हेंबर निर्णायक

अनेक पक्षीय नेत्यांना माहिती आहे की युतीशिवाय निवडून येणे कठीण, परंतु नगराध्यक्ष पदाचा तिढा सुटेपर्यंत कोणतीच आघाडी निर्माण होत नाही. त्यामुळे फॉर्म मागे घेतले जाण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत म्हणजेच २१ नोव्हेंबर सायं. ५ वाजेपर्यंत युतीचे गुऱ्हाळ सुरूच राहील. निवडणूक विभागाच्या माहितीनुसार, अर्जांची छाननी व त्यानंतर फॉर्म रिटर्नच्या दिवसापर्यंत संपूर्ण राजकीय चित्राची दिशा स्पष्ट होणार आहे.

## नायगाव परिसरात वन विभागाच्या कृपा आशीर्वादाने अवैध वृक्षतोड ट्रॅक्टर व ट्रकमधुन खुले आम वाहतूक जोमात वन विभाग कोमात ?

नायगाव तालुक्यातील बरबडा येथे व बरबडा सर्कल अंतर्गत व नायगाव तालुक्यातील असलेल्या गावातील

वन विभागाचे अधिकारी व कर्मचा-याच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षित कारभारांमुळे बरबडा सर्कल मध्ये नायगाव तालुक्यातील परिसरात खुलेआम अवैधरीत्या वृक्षतोड करून तोडलेल्या अनेक वृक्षाची लाकडे ट्रॅक्टर व ट्रकने न येथील राज्य महामार्गावरुन विना अडथळा राजरोसपणे वाहतुक जोमात सुरु आहे तर वनविभाग कोमात असल्याचे दिसून येते कारण या सर्व बाबी कडे वन विभागातील वरिष्ठ अधिका-यांनी वृक्षतोड करून त्यांची तस्करी करणा-यांची चौकशी करून होणारी वृक्षतोड थांबवावी अन्यथा परिसर वाळवंट होण्यास वेळ लागणार नाही अशी प्रतिक्रिया नागरिकांतुन उमटत आहे.

शासनाने एकीकडे झाडे लावा पर्यावरण वाचवा असा मोलाचा संदेश देश बांधवांना दिला परंतु बरबडा व कुष्णुर , घुंगराळा , काहाळा , अंतरगाव , सोमठाना , बेटमोगरा, धुप्पा, कुंचेली, धानोरा, शेळगाव , रामतीर्थ, टाकळी, वजिरगाव , कामरसपल्ली,जिगळा, अजणी, हिप्परगा , चिटमोगरा, बोरगाव थडी, अटकळी, डोणगांव, आदमपूर, आदि सह अन्य गावात लाकडाचे व्यापारी अवैधरीत्या खुलेआम चिंच,आंबा, लिंब,बाभूळ,शिव बाभूळ,आदिसह अन्य वृक्षाची मोठ्या प्रमाणात कत्तल करीत असल्याने पर्यावरणांचा -हास होत आहे.

वनविभागाच्या देगलुर कार्यालयाच्या अधिकारी क्षेत्रातील कर्मचारी वर्ग यांच्या कार्यक्षेत्रात खुलेआम अवैधरीत्या वृक्षतोड करून तोडलेल्या अनेक वृक्षाची लाकडे ट्रॅक्टर व ट्रकने येथील महामार्गावरुन विना अडथळा तस्करी राजरोसपणे सुरु असताना वनविभागाचे अधिकारी मात्र जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष करीत आहेत का अवैध वृक्षतोड करणा-या व्यापा-यांचे मनोबल वाढले आहे. शासनाने एकीकडे झाडे लावा पर्यावरण वाचवा असे सांगत असताना दुसरीकडे यंत्राच्या साह्याने शेकडो झाडाची कत्तल केली जात आहे. या कडे वरिष्ठ अधिका-यांनी वेळीच लक्ष न दिल्यास परीसर वाळवंट होण्यास वेळ लागणार नाही असे नागरिकांतुन बोलल्या जात आहे.

अवैध वृक्षतोड असल्याचे संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी देगलुरचे यांनी या बाबिकडे लक्ष देण्यात अशी मागणी होत आहे

## ग्यानोबा राजाराम कदम यांचे निधन



अर्धापूर (प्रतिनिधी)तालुक्यातील कोंढा येथील ज्येष्ठ नागरिक ग्यानोबा राजाराम कदम (वय ७० वर्ष) वृद्धापकाळामुळे दि.१८ मंगळवारी सकाळी पाच वाजता निधन झाले आहे. त्यांचा पार्थिव देहावर मंगळवार रोजी दुपारी २ वा.कोंढा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.

ग्यानोबा राजाराम कदम यांच्या पश्चात पत्नी,४ मुले,सुना, नातवंडे असा परिवार आहे.ते कोंढाचे माजी उपसरपंच राम कदम, बालाजी उर्फ बंडू कदम यांचे वडील होते.

## लोहा न.पा. नगराध्यक्ष पदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी १०६ उमेदवारी अर्ज दाखल

लोहा (प्रतिनिधी)

नगरपालिका सार्वत्रिक निवडणुक- २०२५ च्या निवडणूक रिंगणात उतरण्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी नगराध्यक्ष पदासाठी एकूण ५ तर नगरसेवक पदासाठी एकुण १०६ उमेदवारी अर्ज दाखल झाले.लोहा नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोमवारी नामांकन दाखल करण्यायाच्या अखेरच्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक विभागाकडे एकूण ५ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. त्यामध्ये भारतीय जनता पक्षाकडून गजानन सुभाषराव सूर्यवंशी,



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अ.प.) कडून शरद पाटील पवार, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कडून व्यंकटेश उर्फ सोनू संगेवार व अन्य दोन असे पाच उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.तर एकुण १० प्रभातील २० नगरसेवक पदासाठी एकूण १०६ नामनिर्देशन पत्र दाखल झाले असल्याची माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली.

लोहा नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर दि. १० नोव्हेंबर पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली.शेवटच्या दिवसांपर्यंत नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी एकही अर्ज निवडणूक विभागाकडे प्राप्त झाले नव्हते. मात्र दि. १७ रोजी नगराध्यक्ष पदासाठी ५ आणि नगरसेवक पदासाठी १०६ नामनिर्देशनपत्र निवडणूक विभागाकडे प्राप्त झाले अशी माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली.एकाच वेळी नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी इच्छुक उमेदवारांची गर्दी झाल्यामुळे संबंधित विभागावर ताण आल्याचे दिसून आले.ईच्छुक उमेदवारांनी आपापल्या परीने शक्ती प्रदर्शन केले असल्याचेही दिसून आले.

## कंधार मध्ये नगराध्यक्षपदासाठी ८ अर्ज तर १० प्रभागात १२० उमेदवारी अर्ज दाखल

कंधार (प्रतिनिधी)

दि. १७ नोव्हेंबर रोजी नगरपरिषद निवडणुकीसाठी शेवटच्या दिवशी सोमवारी रोजी कंधार मध्ये नगरसेवक पदासाठी ८० तर नगराध्यक्ष पदासाठी ५ अर्ज भरण्यात आले आहेत. नगरसेवक पदासाठी एकूण १२० उमेदवारी अर्ज तर नगराध्यक्षपदासाठी एकूण ७ उमेदवारांनी ८ उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. पालिका निवडणुकीसाठी सुरुवातीला अर्ज भरण्याला प्रतिसाद नव्हता. नंतर त्यात वेग आला. शेवटच्या दिवशी अर्ज भरणाऱ्यांनी सकाळ पासूनच पालिकेत गर्दी केली होती. सर्वात जास्त अर्ज प्रभाग क्रमांक १ मध्ये १९ व प्रभाग क्रमांक १० मध्ये १८ अर्ज भरण्यात आले. सर्वात कमी अर्ज प्रभाग क्रमांक ४ मध्ये ६ अर्ज भरण्यात आले.

नगराध्यक्षपदाची एकूण ८ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. यात भाजप कडून गंगाप्रसाद गोविंदराव यन्नावार, एनसीपीकडून अनुराधा चेतन केंद्रे, अपक्ष म्हणून चेतन दौलत केंद्रे, अपक्ष म्हणून कलीम हसन अन्सारी, एनसीपी कडून अब्दुल मन्नान म. सरवर, हणमंत विश्वनाथ लुंगारे यांनी एनसीपी व अपक्ष असे दोन अर्ज दाखल केले. तर काँग्रेसकडून शहाजी अरविंदराव नळगे यांनी अर्ज भरला आहे.

प्रभाग निहाय भरलेले अर्ज : प्रभाग १ - १९, प्रभाग २ - ११, प्रभाग ३ - ११, प्रभाग ४ - ६, प्रभाग ५ - १०, प्रभाग ६ -९, प्रभाग ७ - १४, प्रभाग ८- ९, प्रभाग ९ - १३ आणि प्रभाग १० मध्ये १८ असे एकूण १२० उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून अर्ज मागे घेण्याची अंतीम तरीख २१ नोव्हेंबर असून त्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.